# मेहता मराठी ग्रंथजगत

मे, २०२३

पृष्ठे ६८ किंमत : रु.१५

वर्ष तेविसावे

अंक पाचवा


नेताजी पालकर यांचा विजापूरच्या तटबंदीवर थेट हल्ला, पावनखिंडीतला थरार, सुरतेची महालूट, तीस हजार मोगली फौजेचे उंबरखिंडीत केलेले नि:शस्त्रीकरण, शाहिस्तेखानाला वेसण, कुडाळचे महायुद्ध आणि सागराच्या पोटातले सिंधुदुर्ग निर्मितीचे अचाट स्वप्न ! पस्तिशीच्या उंबरठ्यावर शिवरायांनी उडवलेली 'रणखैंदळ' !

## महासम्राट

खंड दुसरा

## रणखैंदळ

विश्वास पाटील



# पुरस्कारासाठी आवाहन



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत केली गेली.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

## 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
३०,०००/-

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
२०,०००/-



पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१. १ जानेवारी, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ दरम्यान प्रकाशित झालेली पहिली साहित्यकृती या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

२. १ ऑक्टोबर, २०२३ ते १ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत पुरस्कारासाठीचे अर्ज स्वीकारण्यात येतील.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२४ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. तरी इच्छुक साहित्यिकांनी आपले साहित्य मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पत्त्यावर पाठवावे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मे २०२३ ◆ वर्ष तेविसावे ◆ अंक पाचवा

**संपादक :**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक :**
शंकर सारडा

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **पुरस्कार** | **८** |
| **प्रकाशन** | **१०** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| महासम्राट : खंड दुसरा : रणखैंदळ | १२ |
| **अभिप्राय** | **५६** |
| **दिनविशेष** | **६२** |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

**संपादकीय**

## 'मृत्युंजय', 'छावा' आणि 'युगंधर'...सुस्वागतम्

मराठी साहित्य शारदेच्या दरबारात मैलाचा दगड ठरलेल्या साहित्यकृती म्हणजेच 'मृत्युंजय', 'छावा' व 'युगंधर.' जी पुस्तके वाचून अनेक पिढ्यांनी आपल्या वाचनाचा श्रीगणेशा केला अशा या अभिजात कलाकृती म्हणून गणल्या जाणाऱ्या कादंबऱ्या. गेली बरीच दशके वाचकमनावर गारूड केलेल्या साहित्यकृती.

पहिल्याच साहित्यकृतीने स्वत:ची ओळख साहित्य विश्वाला व्हावी अशा व्यक्तींपैकी एक म्हणजे शिवाजी सावंत. 'मृत्युंजय' या त्यांच्या कादंबरीने अनेक नवनवे विक्रम केले, इतिहास रचला आणि महत्त्वाचं म्हणजे 'मृत्युंजयकार' हा किताबही शिवाजी सावंत यांना वाचकांनी प्रेमाने बहाल केला. या कादंबरीला राज्य पुरस्कारासह, मूर्ती देवी सन्मानाने सन्मानित करण्यात आलं आहे.

माझे वडील सुनील मेहता यांनी खूप कष्टाने शिवाजी सावंत यांच्या कुटुंबीयांकडून हक्क प्राप्त करून घेऊन मेहता पब्लिशिंग हाऊसच्या परंपरेला साजेशा खास शैलीत 'मृत्युंजय' कादंबरीची २९वी आवृत्ती २०१३मध्ये दिमाखात प्रकाशित केली. आमच्या असंख्य वाचकांनी तिचे स्वागत केले व उदंड प्रतिसाद दिला. लगेचच २०१४ मध्ये 'छावा' आणि 'युगंधर' या कादंबऱ्याही आम्ही आमच्या प्रकाशनाच्या माध्यमातून प्रकाशित केल्या. नवे मुखपृष्ठ, नव्या मांडणीसह, उत्कृष्ट बांधणी असणारी ही पुस्तके अल्पावधीतच वाचकांच्या पसंतीस उतरली व त्याला कायमच चांगली मागणी येत होती.

२०१७ मध्ये काही कारणास्तव या पुस्तकांच्या प्रकाशन व वितरण इ.बाबींवर न्यायालयाने बंदी घातली. त्यावेळेस सुनील मेहता व सावंत कुटुंबीय यांनी तो निर्णय खुल्या मनाने स्वीकारला व त्याविरुद्धचा लढा चालू ठेवला. शिवाजी सावंत यांचे कुटुंबीय श्रीमती मृणालिनी सावंत व अमिताभ सावंत, वकील कल्याणी पाठक यांच्या पूर्ण सहकार्याने याबाबतचा न्यायालयीन लढा चालू होता. २७ एप्रिल, २०२३ रोजी जिल्हा सत्र न्यायालयात जो



निर्णय दिला गेला, त्या निर्णयाने पूर्ण प्रकरण धसास लागले नसले तरीही न्यायालयाने उठवलेली बंदी नक्कीच स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे हा लढा एक पायरी पुढे गेला आहे, असे म्हणण्यास हरकत नसावी. त्यामुळे आम्हाला आणि दर्जेदार, उत्कृष्ट बांधणी असलेल्या 'मृत्युंजय', 'छावा' आणि 'युगंधर'सारख्या साहित्यकृतींचा जो चोखंदळ वाचकवर्ग आहे त्याला, एक आशेचा किरण या माध्यमातून दिसला आहे, असं वाटतं.

अगदी अलीकडेच सुधा मूर्ती यांचे 'हरवलेल्या गोष्टीचे रहस्य' हे पुस्तक आम्ही प्रकाशित केले. तो त्यांचा २४वा अनुवाद होता. याच महिन्यात आम्ही सुधाताईंच्या 'द गोपीज डायरी' या पुस्तकाचा अनुवाद 'गोपीची डायरी' वाचकांसाठी घेऊन येत आहोत. सुधाताईंचे रौप्यमहोत्सवी अनुवादित पुस्तक म्हणून आम्हाला याचा सार्थ अभिमान आहे. सुधाताईंचे साहित्य हे वाचन संस्कृती वाढवण्यात व जोपासण्यात एक उत्तम असा पर्याय असून, आजही वाचकप्रिय आहे. सांगली येथे झालेल्या कार्यक्रमाच्या वेळेस सुधाताईंनी हे पुस्तक मुलांना सुट्टीमध्येच मिळाले पाहिजे, असा प्रेमळ आग्रह केला होता. प्रकाशक म्हणून त्यांचा हा आग्रह मान्य करून या मे महिन्यात हे पुस्तक बालचमूंसाठी उपलब्ध होत आहे.

याच बरोबरीने महाकादंबरीकार विश्वास पाटील यांच्या 'महासम्राट' या शिवचरित्रावर आधारित कादंबरीमालिकेतील दुसरा खंड 'रणखैंदळ' याचेही प्रकाशन या महिन्यात होणार आहे. 'झंझावात' पहिल्या खंडात शिवपूर्वकाल ते अफजलखान वध या कालखंडाचा आढावा घेऊन वाचकांना त्या काळाची सफर घडवून आणली गेली. आताच्या 'रणखैंदळ' या दुसऱ्या खंडात पन्हाळ गडाचा वेढा, पावनखिंडीतील थरारक झुंज तसेच शिवलंका सिंधुदुर्ग किल्ल्याचे पाहिलेले स्वप्न व त्याची बांधणी हा प्रवास वाचकांना घडणार आहे. वाचकांसाठी एक अनोखी पर्वणी या निमित्ताने मिळणार असून हा महिना व प्रकाशित होणारी पुस्तके खास अशीच आहेत.

'रणखैंदळ' पालकांसाठी व 'गोपीची डायरी' पाल्यांसाठी हा दुग्ध-शर्करा योग आम्ही जुळवून आणला आहे. महाकादंबरीकार विश्वास पाटील आणि लोकप्रिय लेखिका सुधा मूर्ती यांच्या साहित्यकृतींना वाचकांचा नेहमीच भरभरून प्रतिसाद लाभतो. याही वेळेस तो तसाच लाभावा, हीच अपेक्षा.

अखिल मेहता

# मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazon kindle | Google Play Books

Find us on: facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक


**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

पु

र


स्का

र

## अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचे उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार


अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ, पुणे यांच्यातर्फे दिले जाणारे उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले. हे पुरस्कार सन २०२२ या वर्षात प्रकाशित झालेल्या पुस्तकांसाठी देण्यात आले.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झालेल्या **अजब डोंगर आणि इतर गोष्टी** (ले. राजीव तांबे)**, खळाळता अवखळ झरा** (ले. एकनाथ आव्हाड) **- मुखपृष्ठ - प्रथम पुरस्कार, चंद्रमोहन कुलकर्णी, राजाचा घोडा आणि इतर गोष्टी** (ले.राजीव तांबे) **बालसाहित्य-उत्तेजनार्थ पुरस्कार** या पुस्तकांना मिळाले. पुरस्कारार्थींचे मेहता पब्लिशिंग तर्फे मन:पूर्वक अभिनंदन.













## ‘जीवनसाधना गौरव पुरस्कार’

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या वतीने देण्यात येणारा ‘जीवनसाधना गौरव’ पुरस्कार ज्येष्ठ इतिहासकार व आपले लेखक डॉ. जयसिंगराव पवार यांना जाहीर झाला आहे. दि. २६ एप्रिल रोजी धनकवडी येथील भारती विद्यापीठाच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे डॉ. जयसिंगराव पवार यांचे हार्दिक अभिनंदन.



◆

### डॉ. जयसिंगराव पवार यांची आम्ही प्रकाशित केलेली पुस्तके

- राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे
- आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध
- शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?
- राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे
- राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे
- राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे
- शिवछत्रपती : एक मागोवा
- मराठेशाहीचे अंतरंग
- छत्रपती संभाजी : एक चिकित्सा
- राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा
- मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध
- समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती
- क्रांतिसिंह नाना पाटील
- वेध अमुच्या इतिहासाचा
- छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ
- व्यक्तिवेध : शरद पवार... ते ...गोविंद पानसरे
- युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी
- शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना
- राजर्षी शाहू छत्रपती आणि सामाजिक न्याय
- दादाजी कोंडदेव कोण होता?

◆

प्र का श न

## रॉकस्टार स्कॉलर डॉ. सूरज येंगडे : प्रा. हरी नरके

'आपले नायक कोण, हे आपल्या युवकांनी ठरवायला हवे.' असे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीचा नवा आवाज आणि हार्वर्ड विद्यापीठातील स्कॉलर असलेल्या डॉ. सूरज येंगडे यांनी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' प्रकाशित **'कास्ट मॅटर्स'** या त्यांच्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या 'व्हर्च्युअल चळवळीचे वास्तव प्रकटीकरण' या विषयावर आपल्याशी साधलेल्या संवादरूपी वैचारिक मंथनात केले.

बालपणापासूनच अंधाऱ्या आयुष्याशी झटून अकादमिक क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करून हार्वर्ड विद्यापीठापर्यंत पोहोचणारे डॉ. सूरज मिलिंद येंगडे यांनी विषमतामूलक व्यवस्थेवर परखडपणे परीक्षण केलेल्या 'कास्ट मॅटर्स' या आत्मकथनाचा मराठी अनुवाद अलीकडेच 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे प्रकाशित झाला. या निमित्ताने 'व्हर्च्युअल चळवळीचे वास्तव प्रकटीकरण' या विषयावर वाचकांशी संवाद साधण्यासाठी ते पुणेकरांच्या भेटीला आले होते. त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी ज्येष्ठ अभ्यासक प्रा. हरी नरके हे उपस्थित होते. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथदालनात हा संवाद आयोजित केला होता. यावेळी वाचकांना 'कास्ट मॅटर्स' या त्यांच्या पुस्तकावर त्यांची सही मिळवण्याची संधीही मिळाली.



जागतिक पातळीचे लेखक असलेले महात्मा फुले हे पहिले भारतीय आहेत. तसेच ललित आणि वैचारिक ताकदीच्या जागा 'कास्ट मॅटर्स' या पुस्तकात असल्याने या पुस्तकाची उंची वाढली आहे, असे प्रा. हरी नरके यांनी या संवादातून सांगितले.




आपल्याकडील लोकांकडे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे व ते त्यांना वापरायचेही आहे; परंतु त्यांच्या मनात भीती आहे. तसेच सोशल मीडियावरील माहिती पडताळून न घेतल्यास अनेक मिथके तयार होतात, आणि आपण त्यांना बळी पडतो. त्यामुळे आपण यात जपून उतरायला हवे. मिसकोटच्या बाबतीत आपण जबाबदारीने वागायला हवे, असे डॉ. सूरज येंगडे यांनी यावेळी सांगितले. भारतीय माध्यमांवरही सूरज यांनी यावेळी टीका केली. आपल्याकडे असलेल्या माध्यमांचा उपयोग कसा करता येईल,याचा विचार बहुजन समाजाने करायला हवा. टेलिव्हिजनच्या दुनियेने समाजात दोन टोके निर्माण केली आहेत, परंतु समाज हा दोन टोकांमध्ये न फिरता ३६० अंशामध्ये फिरत असतो, हे त्यांनी ध्यानात घ्यायला हवं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या संदर्भातील 'विशेष दिन' हे बाहेरच्या देशांत सण म्हणून साजरे केले जातात, यांचा सन्मान करण्यात सगळ्यात मोठी भूमिका तेथील विद्यापीठांची आहे, असेही सूरज यावेळी म्हणाले.


मराठीत पुस्तक लिहिण्याची इच्छाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक अखिल मेहता, साहिल मेहता, रूपा मेहता आदी याप्रसंगी उपस्थित होते.

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या प्रमुख संपादक योजना यादव यांनी आभार मानले

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# महासम्राट

## खंड दुसरा

# रणखैंदळ

### विश्वास पाटील

*अफजलखानाला संपवलं शिवाजीराजांनी...पण नंतर एका बाजूने सिद्दी जोहर, दुसऱ्या बाजूने शाहिस्ताखान, तिसऱ्या बाजूने इंग्रज आणि चौथ्या बाजूने बाजी घोरपड्यांसारखा स्वकीय शत्रू स्वराज्याला वेढत होते...आपल्या रणनीतीने, चातुर्याने आणि जिवाला जीव देणाऱ्या मावळ्यांच्या साह्याने महाराजांनी या चारही शत्रूंना चारी मुंड्या चीत केलं...महाराजांच्या अतुलनीय पराक्रमाच्या गाथेला बाजीप्रभूंच्या, शिवा काशिदच्या बलिदानाची झालर आहे...नेताजींच्या शौर्याची उंची आहे...शहाजीराजांच्या अतुलनीय धैर्याची पार्श्वभूमी आहे...जिजाऊंच्या वात्सल्याची आणि कणखरपणाची साथ आहे...सिंधुदुर्गाच्या उभारणीने स्वराज्यात जलदुर्गाची नांदी झाली...तर अशी ही स्वराज्याची सुराज्याकडे होणारी वाटचाल, वीररसाचा मनोज्ञ आविष्कार, इतिहासातील बारीकसारीक तपशिलांसह आणि चित्रमय वर्णनांसह अनुभवा विश्वास पाटील यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेल्या 'रणखैंदळ'मधून...*



## मेहमानराव!

शिवा काशिदच्या रक्ताने माखलेल्या तलवारींची पाती पुसून आदिलशाही फौजी लगेच वेगाने बाहेर पडले.

संतापाने वेडा झालेला सिद्दी मसूद सर्वांच्या पुढे धावत होता. याआधीच त्याने खास तयारी केली होती. आपल्या पस्तीस हजार विजापुरी फौजेतून साडेतीन हजार जिगरबाज घोडेस्वारांचे एक कडवे पथक बाजूला काढून त्याला खडी तालीम दिली होती. अत्यंत धामधुमीच्या प्रसंगीच त्याचा वापर करायचा हे त्या पथकाचे ध्येय होते.

मध्यरात्र व्हायला आली होती. आपल्या चिलखती वेढ्याचे पोट फोडून शिवाजीसारखा दुश्मन बाहेर पडल्याच्या धक्कादायक वस्तुस्थितीने मसूदच्या डोक्यावरचे बाल खडे झाले होते. पिसाळलेल्या अस्वलासारखा तो काही क्षण जागेवरच पाय आपटत नाचला होता. किल्ल्याभोवती आदिलशाही सेनासागर खवळलेल्या लाटांसारखा खडा होता. अशाही परिस्थितीत बंडखोर शिवाजीने गुंगारा दिल्याचा मसूदला आणि फाजलखानाला प्रचंड गुस्सा आला होता. त्यातच शिवा काशिदच्या सोंगाने अनाठाई रात्रीचे दोन तास वाया घालवले होते.

फसवणुकीच्या एखाद्या थप्पडीसारख्या तडाख्याच्या त्या झिणझिण्या मसूदच्या मस्तकातून अद्याप उतरल्या नव्हत्या.

आपल्या घोड्याला पुन:पुन्हा टाचा मारत वैतागलेला सिद्दी मसूद आपल्या सोबत्यांवर मोठ्याने ओरडत, दौडत निघाला होता, ''गया सिवा! निकल भी गया! भाग गया! शैतान पूरी बेइज्जती करके भाग गया!''

''सरकार, मिलेगा। आखिर वह जायेगा कहाँ?'' बाकीचे बोलले.

''अगर वह नहीं मिलेगा, तो सुलतान साहबको कैसे मुँह दिखायेंगे हम? हमारे ससुरजी, वह जोहरमियाँ पागल है बुड्ढा—उनके दिन वैसे खतम होनेवालेही थे।—लेकिन हमारे आनेवाले कल का क्या?—आदिलशाही दरबार छोडके ऐसे हालातमें हमें शमशानमें भी कोई खडा नही करेगा।''

अंधारपावसातून, चिखलातून त्या फौजींच्या अंगाखालची ती बलदंड घोडी तोफेच्या गोळ्यांसारखी पुढे धावत होती. गडाखालचा तळवटीचा माळ पार करून ते घोडदळ मावळतीच्या बाजूला आले. तिथेच आदिलशाहीची एक

चौकी होती. तिथे पलित्यांच्या आणि चांदण्याच्या पुसट प्रकाशात सिद्दी मसूद आपला घोडा गरगर फिरवत पहारेकऱ्यांजवळ पोचला होता. तेवढ्यात मजबूत अंगाचा एक मराठा सरदार आपल्यासोबत दहा निवडक घोडेस्वारांचे पथक घेऊन समोरच्या अंधारातून दौडत थेट सिद्दी मसूदच्या पथकाजवळ आला.

"अरे ऽ हां-ये-तो-ये-सिवाच्या फौजेतला एक बडा ठाणेदार—"

"हां, हां खानसाहेब—मीच तो जातिवंत आन् खानदानी मराठा-आपले रिस्तेनाते थेट सूर्यकुळाशी लागते—"

धुक्याच्या लोटातून पुढे झेपावत आलेला तो मराठा सरदार आपली ओळख सांगत होता. त्या अर्धवट धुक्यामध्ये गद्दाराच्या काळ्या चेहऱ्याला शोभावा असाच त्याचा थाट दिसत होता; पण सिद्दी मसूदच्या बगलबच्च्यांनी लगेच त्याला छेडले, "अबे हरामजादे! ऽ तुम तो अभी भी सिवाके नौकरीमें हो—"

"हो—आहे अन् राहीनबी—"

"पकडो-उडा दो इस बदमाशकी गर्दनऽऽ" पाठीमागून गर्जना ऐकू आल्या.

अन् "दुश्मन का आदमी!", "सिवा का आदमी!" असा शोर करत त्या मराठा सरदाराभोवती गराडा पडला. काही जणांनी त्याचे दोन्ही दंड जाम पकडले. काहींनी त्याच्या झाडासारख्या शरीराला पाठीमागून कवळा भरला. त्याला तसाच घट्ट दाबून धरला; पण तो सरदार चिडून अंगावर येण्याऐवजी खुदूखुदू हसत होता. उपहासाने. थोडा खुनशी गमतीने. ते पाहून मसूदने आपल्या उजव्या हाताचा एक सणसणीत लाफा त्याच्या गालावर ठेवून दिला आणि जांबियाचे पाते त्याच्या नरडीला लावले. तो खवळून ओरडला, "बदमाश ऽऽ पागल इन्सान, उधर सिवाने हमारे कपडे उतारे और तू हँस रहा है—?"

"त्या कारणाने नव्हे मसूदखान—तुम्ही स्वत:हून स्वत:चा जो तमाशा करून घेतलात ते बघून मला हसू आवरंना!"

"मतलब?"

"शिवाजीराजा इतका 'महाचतुर' आहे. अगदी तुमच्या त्या बिरबलाचा बाप आन् अशा दहा ठकसेनांचा चाचा! अरे भाई, उन्हे कितना ढूँढोगे और कब तक ढूँढोगे?—तो अशा अंधाऱ्या, दुर्धर वाटेने बेपत्ता झालाय की ऽ वर ढगातल्या चंद्रचांदण्यालासुद्धा त्याचा थांगपत्ता लागायचा नाय—"

"तर मग त्याचा असली ठावठिकाणा काय? कौन जानता है?" सिद्दी

मसूदने सवाल केला.

"फकस्त मी ऽ अशा गच्च पावसाळी, घनदाट झाडीच्या वाटेनं, ज्या रानातून घोडा चालू शकत नाही अशा किर्र, घन्या, शेवाळल्या, सटपटत्या जंगलझाडीतून शिवाजी पसार झालाय—"

"ऐसा? लेकिन उसकी जानकारी आपको कैसी?"

"खानसाहेब, शिकार हा एखाद्या शिकाऱ्याचा रोजचा धंदा असतो. तुमच्या नशिबात असेल तर शिवाजीची ही बडी शिकार तुम्हाला मीच मिळवून देऊ शकतो."

सिद्दी मसूद आणि त्याच्या साथीदारांनी बाजूला जाऊन आपसात गोष्टी केल्या. एक गोष्ट खरीच होती. ही आजूबाजूची पाऊसपाण्याने आणि अंधाराने भरलेली दरीखोरी म्हणजे एक भुताटकीचे महाजाल होते. साधे बाजूच्या गावातून एखाद्या इसमास बोलावण्यासाठी माणूस धाडला, तरी अशा अंधारवाटांतून, चिखलातून त्याला माघारा येण्यास अर्धी रात्र संपून गेली असती तर अशा वेळी शिवाजीला कोण शोधणार?

तो मराठा हसत सांगू लागला, "ह्या रानातल्या निरनिराळ्या दऱ्याखोऱ्यांतनं नदीकाठानं एकूण किती पहाडी वाटा निघतात, कुठे मिळतात, ती चौकी फकस्त मलाच माहीत आहे."

"बोला तुकाजीराव—" मसूद म्हणाला.

"अरं थांबा थांबा, उगाच जिभेवर माझं धडधडीत नाव घेऊ नका. कामगिरी गुप्त है, फार तर मेहमानजी म्हणा मला—"

सिद्दी मसूदने ओळखले. ह्या बंद्याच्या बातांमध्ये दम आहे. हा मरगठ्ठा असून 'शिवाजी' हे नाव उच्चारताना त्याच्या जिभेतून सांडणारे तिरस्काराचे आणि जळफळाटाचे विष लपत नाही. हा शिवाजीचा साताजन्माचा वैरी दिसतो. या गोष्टींचा बोध होताच अधिक वेळ न घालवता सिद्दी मसूद सरळ त्याला येऊन भिडला. त्याने त्याला सरळ सांगितले, "चला मेहमानजी, हमारी जान बचाओ!—तुरंत निघू या!"

"बोला ऽ तुम्हाला काय हवं—?"

"हमे वो जहन्नमी सिवा चाहिए और वो भी जिंदा!"

"मंग चला की, तुमच्या मुठीतून सटकलेला पंछी उजाडता उजाडता जंगलातल्या कोणत्या घाटावर पुन्हा तुमच्याच हाताच्या पंज्यामध्ये सापडू

शकतो हे फक्त या मेहमानरावालाच ठाऊक आहे.''

ती आदिलशाही तुकडी काहीशी भांबावली, मेहमानरावाची सोच पक्की दिसत होती; पण काही जणांना पुन्हा संशयाच्या भुताने घेरले. जर हाही शिवा काशिदचा बाप निघाला तर? ह्यानेही उरलेली रात्र गिळून टाकली तर? ते सारे एकमेकांच्या डोक्याला डोकी घाशीत उभे होते. नेमके करावे काय?

इतक्यात लांबून अंधारातून दुसऱ्या एका मराठ्याचा खणखणीत आवाज सर्वांच्या कानी पडला, ''अरे पोरांनो ऽ तो धाडसी मराठा खरं तेच सांगतोय. माझ्यासारखाच तोही आणखी एकच मराठा आहे ह्या रानात, जो त्या शिवा भोसल्याच्या सर्वनाशासाठी गद्दारीच्या पातकात खोल उडी घेईल; कारण शिवाजीचं दमन आणि दफन हेच आमच्या जिंदगीचं ध्येय आहे!'' तो ओळखीचा आवाज ऐकताच सारे आदिलशाही सैनिक हरखून गेले. ''आईये चाचाजान ऽऽ आईये'' असे म्हणत सिद्दी मसूदने अत्यंत हर्षभरित मनाने अंधारातून देखण्या सळसळत्या नागासारख्या उगवलेल्या बाजीराजे घोरपड्यांचे स्वागत केले. शिवाजीच्या पाठलागात आपण स्वत:ही सामील होणार, हे बाजी घोरपड्यांनी नमनालाच सांगून टाकले. तेव्हा सिद्दी मसूद काळजीने बोलला, ''लेकिन चाचाजान, आपकी उमर—?''

''पर्वा नाय! अरे पोरा, जिंदगीभर मी एकाच स्वप्नाच्या पूर्तीसाठी कोळशासारखा अहोरात्र जळतो आहे. त्या बदमाश शहाजी भोसल्याच्या शिवाजी नावाच्या ह्या दगाबाज पोराला सरणावर धडाधडा जळताना बघणं, हेच आता ह्या बाजीराजाचं एकमेव स्वप्न उरलंय.''

बाजीराजांनी सिद्दी मसूदसोबत जाण्याविषयी बराच वेळ मनधरणी केली; पण मसूद हसून बोलला, ''चाचाजान, आम्हाला त्या सिवापर्यंत खात्रीनं घेऊन जाणारा हा वाटाड्या देता आहात. मैं आपका उम्रभर एहसानमंद रहूँगा।''


''चल पोरा, मीबी येतो तुमच्यासंगं!'' बाजीराजे उत्साहाने ललकारले.

''नहीं नहीं चाचाजान, आप जैसे भले आदमीको इस उम्रमें इतनी तकलीफ देना यह मुनासिब नही है।''

अखेर लबाडांचा मनमिलाफ झाला. त्या व्यवहाराला बाजीराजे घोरपडे जामीन झाले. तशा मेहमानराव आणि मसूदने घोड्यावरूनच ओणवे होत एकमेकांना करिबी रिस्तेदारांसारख्या करकचून मिठ्या मारल्या. घोड्यांना टाच बसली. खुशीने त्या दोघांनी एकदुसऱ्याचे मुके घेतले. दोघेही पटकन भरधाव

**नवी संहिता... नवा आशय...**

## द मदर




### पर्ल एस. बक
अनुवाद : **भारती पांडे**

आई... नवरा असूनही झाली विधवा... मातृत्वाचा वसा मात्र जपला...
एका आईच्या जीवनाचं बहुपदरी भावनाट्य

**किंमत : ३००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

## गॉडफादर्स ऑफ क्राइम




### शीला रावळ

दाऊद, अबू सालेम, छोटा राजन... अंडरवर्ल्ड मधील महत्त्वाची नावं... त्यांच्यासारख्या गुन्हेगारांच्या जीवनाचा एका पत्रकाराने निर्भयपणे मांडलेला लेखाजोखा

**किंमत : ४२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

वेगाने पुढे निघाले.

त्या भयाण रात्री तीन हजाराचे घोडदळ घेऊन पाऊसवारा तुडवत ते सर्व जण मावळतीच्या दिशेने दौडू लागले.

पहाडाच्या माथ्यावरचे पश्चिमेकडे धावणारे ते उंच टोक घोड्याच्या पाठाणासारखे दिसत होते. त्याच्या मधल्या निमुळत्या भागावरून ते सहासातशे चिवट लढवय्ये मावळे मुंग्या सरकाव्यात तसे पुढे सरकत होते.

मध्येच त्या पर्वताच्या माथ्यावरच्या अस्पष्ट अंधारात उघडे बलदंड खडक डोळ्यांना दिसू लागले. तिथे एक उंच खांबासारखा पाषाण उभा होता. तो निमुळता होत जणू अस्मानापर्यंत पोचत होता. तर त्याच्या आगेमागे अनेक निखळलेले प्रचंड शिलाखंड दिसत होते. कालौघात काहींना चक्क मानवी आकृत्यांसारखा आकार प्राप्त झाला होता. चालताचालता काही वाटाडे राजांना सांगत होते,‘‘हीच ती कुवाँरखांबीची खिंड. तो सर्वांत उंच सड्या अंगाचा पाषाणी खांब म्हणजेच कुठल्यातरी मागच्या युगातली कुँवारी नार! ते प्रचंड उंचीचे एकटेदुकटे खडक म्हणजे तिच्या लग्नासाठी सजून निघालेले वऱ्हाडकरी, पाहुणे मंडळी. त्या सुकुमार पोरीच्या मंगलकार्यासाठी ह्या जंगलरानातून ऐन उन्हाचं वऱ्हाड निघालेलं होतं. सोबत वाजंत्रीही होते म्हणतात; पण त्या बिचारीला कोणाचा तरी भयंकर शाप भोवला. अन् आख्खं वऱ्हाड जागच्या जागी गुडूप झालं. वऱ्हाडाचं रूपांतर पाषाणखंडात झालं. अखेर ती कुँवारी पोर कुँवारीच राहिली; मात्र ह्या रानात जेव्हा रात्री-बेरात्री वारा भिरभिरत वाहतो, तेव्हा आजूबाजूच्या जंगलरानातल्या गावकऱ्यांना ती मंजूळ,लंबी शीळ चक्क ऐकू येते. त्या सुकुमार सौंदर्यवतीच्या मंगलकार्याची आणि अधुऱ्या स्वप्नांची तार इथला रानवारा अध्येमध्ये छेडत राहतो.’’

लोकसमजुती आणि दंतकथा काहीही असोत. हजारो वर्षांच्या प्रवासात खरोखरच त्या पहाडमातीचे मृदाकरण झाले होते. त्या अश्मस्तंभांना वऱ्हाडासारखा सुरेख आकार प्राप्त झाला होता. त्या काट्याकुट्यांनी भरलेल्या, दगडी चिपऱ्यांच्या, गिळगिट्या आणि जागोजाग पाण्याने भरलेल्या वाटेवर बाजीप्रभूंना उसंत नव्हती. बहिरी ससाण्यासारखी त्यांची नजर आगेमागे वळत होती. काहीवेळा ते त्या पथकाच्या आघाडीला धावत पुढे जात होते तर काहीवेळा चक्क पाठीमागे राहणे पसंत करत होते. चौफेर गस्त घालत दुश्मनाकडून अंधारात

काही हालचाल तर होत नाही ना, या गोष्टीचा सावध राहून कानोसा घेत होते.

पुढचे दोन पहाड चढून आणि उतरून झाले. आता या खोल दऱ्यातले ओढे आणि नाले उफराट्या दिशेला म्हणजे कोकणाच्या बाजूला वाहू लागले. वाटेत एका छोट्या रानवट नदीचा जोरदार आवाज कानावर पडू लागला. कड्यावरून घोड्यांनी उड्या घ्याव्यात तसे एका अंगाने पर्वतावरून खळाळून पाणी खाली येत होते. गेल्या चार दिवसांत पर्जन्याचे असे तोंड फुटले होते की जणू आभाळच फाटून पाणी खाली ढासळत होते. त्यामुळे त्या राननदीतल्या पाण्याचा जोर प्रचंड होता.

त्या नदीकाठी अर्धवट अंधारात मराठ्यांचे हे बहाद्दूर पथक एकदाचे पोचले; परंतु समोर दुथडी भरून वाहणारी ती नदी, तिचा तो प्रचंड वेगाचा प्रवाह आणि त्या पाण्याचा तो रोंरावता आवाज ऐकून सोबतचे त्या रानातले वाटाडे, धनगर आणि कोळी काठावरच थबकले. पुढ्यातल्या त्या पाण्याचे थैमान बघून त्यांचे चेहरे कमालीचे गांगरून गेले. त्या जंगली नदीचे ते रौद्र भयानक रूप काळजाला दडपणारे होते. काय करावे? तेवढ्यात पाठीमागच्या करवंदीच्या जाळवंडातून आपल्या सहकाऱ्यांसह शिवराय पुढे सरसावले. त्यांनी दुरूनच आवाज दिला, ''चला कसे! अरे, थांबलात का?''

''बघा ना राजे, किमान पाच हत्तींच्या अंगासारखा पाण्याचा भरभरून जाणारा हा लोट तरी बघून घ्या,'' बाजीप्रभूंचा आवाज घुमला. तितक्यात काळजीच्या सुरात शंभुजी बोलला, ''शिवाजीदादा ऽ ह्या प्रचंड पाण्याची एवढी मोठी खळाळती धार ओलांडणं खूपच धोक्याचं होईल.''

शिवराय आणखी पुढे झाले. गांगरून गेलेल्या सर्वांनी त्यांच्याभोवती कडे केले. राजांनी धिम्या स्वरात विचारले, ''पण आपली नेहमीची रानातली उपयोगाची बारदाणं—दोरखंड, वाली, मेकुसं, सारं सोबत आहे नव्हे?''

''सारं आहे राजं; पण वर डोंगराच्या माथ्याकडे आभाळ फाडत कोसळणारं पाणी तरी बघा. असंच पाण्यात घुसू तर जन्माचे फसू. निश्चित काहीतरी घोटाळा हुयाचा!'' बंडोबा गावडे, इतर वाटाडे आणि सैनिक सांगू लागले.

पाऊस शिळणधार कोसळतच होता. तो पाऊस कसला! निसर्गदेवतेचे सपसप बसणारे कोरडेच जणू! आपल्या टापरीतून कपाळावर पाझरणारे पाणी शिवरायांनी आडव्या बोटाने पुसून काढले. ते म्हणाले, ''ठीक आहे. असं करू, थोडं मागे फिरू. पाठचा उतार पुन्हा चढू. थोडा वळसा घेऊन पुन्हा पुढे

निघून जाता यायचं नाही का? जसेजसे आपण वर सरकत जाऊ, तेवढा पाण्याचा लोंढा लहान, अरुंद होत जाईल.''

''राजं तसं जाताबी येईल; पण ही बाजूची डगर तरी बघा. अशा ओल्याकिच्च पावसात ह्या अशा तुटक्या घसरडीच्या डगरीनं वर चढायची हिम्मत ताकदवान गवे आणि रानडुकरंसुद्धा करत नाहीत.''

''अरे, पण घिसाडघाई आहे. दुसरा मार्ग तरी काय?''

''पाठीमागचा ओला डोंगर पुन्हा चढणं, वळसा घेऊन पुन्हा माथ्यावरच्या पठारानं पुन्हा पुढं येणं, सगळाच मामला जिकिरीचा अन् वेळखाऊ.''

''म्हणजे खोळंबा किती वेळेचा?'' राजांचा सवाल.

''किमान चार तासांची उलटी तंगडतोड. कदाचित अर्धा दिवसही वाया जायचा.'' वाटाड्यांशी उभ्या उभ्या चर्चा करत शंभुजींनी आणि फुलाजींनी वेळेचे मातेरे करणारा तो हिसाब सादर केला.

''छे छे! अशी देरी आपल्या कार्याची नासाडी करेल,'' पाऊसपाण्याने भिजलेली आपली वस्त्रे आणि अंग झाडत राजे निर्धारी, गंभीर सुरात म्हणाले, ''चला ऽ आता मागे वळणे नाही. घ्या गंगेचं नाव आणि घुसा पाण्यात—जे घडेल त्याचा साक्षी काळ—पण अंगावर चालून आलेल्या संकटाला टक्कर देण्याशिवाय या क्षणी आपल्या हातात काहीच उरलेलं नाही!''

वाटाड्या पोरांनी पाण्यात चटचट उड्या घेतल्या. दोरखंडांचे शेव पकडत आणि पाण्याच्या प्रचंड लोंढ्यात अध्येमध्ये क्वचित दिसणाऱ्या झाडांना दोरखंडाचे तिढे देत ती वेगाने वाहत्या पाण्याच्या लोंढ्याशी टक्कर देत पुढे सरकू लागली. बुडू लागली; पण लढू लागली. बाजीप्रभू निर्धाराने पाण्यात उतरले, त्यांनी राजांना हात दिला. बाजींचा देह उंच आणि तगडा. त्या मानाने शिवरायांची उंची कमी होती. त्यामुळे बाजीप्रभूंनी त्यांना खांद्यावरून पुढे न्यायचे ठरविले होते. त्या गोष्टीला राजांनी स्पष्ट नकार दिला. ते पाण्याच्या पोटातून पुढे सरकू लागले. रानातल्या तरण्याबांड पोरांनी त्यांच्या आगेमागे कवच केले होते. त्यात शंभुजी आणि फुलाजी खूप आघाडीवर होते. अनेक दिवसांच्या कोसळत्या पावसाने त्या नदीतले खळाळते पाणी अतिशय स्वच्छ आणि कमालीचे थंडगार बनले होते. त्यातून चालणाऱ्या माणसाला पाण्याचा प्रवाह खालच्या बाजूस रेटत नेत होता.

काही पोरे पाण्यात थकली. डुंबली. महत्प्रयासाने पल्याडच्या काठाला

जाऊन लागली. राजांच्या समोरच त्यांचा हात पकडून कडाचे बाजीप्रभू चालले होते. एका बाजूने पाण्यात अडखळत फुलाजी चालला होता. पल्याडचा काठ महत्प्रयासाने जवळ आला. फुलाजीच्या पायाखाली त्या नदीत मोठा खड्डा आला असावा,त्यामुळे तो अचानक खाली बुडाला, पोहणीस लागला, पलीकडच्या अंधारात दिसेनासा झाला. सर्व जण एकदाचे पल्याड पोचले. शंभुजीने सावध हाक दिली, ''फुलाजी ऽऽ फुला, कुठं आहेस तू?'' रानातल्या पोरांनी पुन्हा पाण्यात धडाधड उड्या घेतल्या. अंधारात बेपत्ता फुलाजीचा शोध सुरू झाला. तेव्हा काठाजवळच्या रानवेलीच्या एका गुंतावळ्यात फुलाजी फसल्याचे आढळून आले. वेलींच्या तिढ्यात त्याचे हात अडकले होते. त्याला पोहणे जमतच नव्हते.नाकातोंडात पाणी गेल्याने त्याची चर्या पांढरीफटक पडली होती. तो जोरजोराने श्वास घेत होता. सुटका व्हावी यासाठी माशासारखा तडफडत होता.अगदी शेवटच्या क्षणी त्या रानपोरांच्या घाईने तो कसाबसा बचावला गेला.

पलीकडचा काठ लागताच सगळे समोरच्या जीवघेण्या रबरबीत चिखलातून पुन्हा वेगाने जाऊ लागले.समोरच्या कड्याची दरड चढू लागले,तेव्हा बाजीप्रभू आपल्या भावाजवळ आले. त्यांनी त्याला दमात घेतले, ''अरे फुलाजी, थोड्या हुशारीनं चल. नाहीतर बेफिकीरीनं मरण केव्हाही गळा घोटील रे पोरा.''

''दादा! आपल्या राजांसाठी मला मरणानं गाठलं तर ती मी आपली पुण्याईच मानेन.''

''मूर्खासारखा बोलू नकोस फुलाजी. कसलंही संकट येऊ दे. समोर यमराज उभा राहिला तरी त्याच्या छाताडावर ठोसा मारून पुढे जाऊ; पण बेटा, आपले राजे इच्छित स्थळी पोचेपर्यंत तुला काय आन् मला काय, मरणाला मिठी मारायचा अधिकार उरलाच कुठं आहे बाळा?'' ती काळवाणी उच्चारताना बाजींचा स्वर नकळत ओलावला होता.

पुढे वाटेत अजून काही उंच पर्वतासारखी टेकाडे आणि त्याहून खोल दऱ्या लागल्या. वाऱ्याच्या पाठीमागून पाऊस पळावा, अन् पावसाची पाठ धरून वारा जोराजोसाने वाहत राहावा, तसा तो वाटेतला उंच कड्यांचा आणि खोल दऱ्यांचा पाठशिवणीचा जणू खेळच सुरू होता.

मार्गात आधी रिंगेवाडी आली. पुन्हा पाटेवाडीचा चढ लागला. रस्त्यात पावडाईच्या खिंडीने पावसातही घाम फोडला.तिथे बाजूलाच दाट वृक्षांचे एक

बन होते. त्या गर्द आणि घनदाट झाडीत खालची जमीन बऱ्यापैकी कोरडी राहिलेली होती. वरच्या झाडापानांनी पाऊस रोखला गेला होता. तिथेच उघड्यावर पावडाई मातेचे जीर्ण मंदिर होते. आतापर्यंत साधारण नऊ-दहा तासांची अखंड चाल झाली होती. नाही म्हटले तरी पावसातल्या, काट्याकुट्यातल्या आणि कमालीच्या ओल्याकच्च रानातून एकसारखी चालून आलेली वाट प्रत्येकाचा ऊर फोडणारीच होती.

बाजूच्या मंदिरातली पावडाई उघड्यावरच वाघाटीच्या आणि बोराटीच्या वेलींच्या दाट छताखाली उभी होती. तिची ती तीन फुटाची दगडी मूर्ती. अंगावर रानातल्या भाविकांनी तेल ओतून, त्यातच हळदी-कुंकवाचे मळवट भरून तिला वर्षानुवर्षे लेप चढवला होता. शिवाय प्रतिवर्षी ऊन, वारा आणि पावसाच्या तडाख्याने तिला अधिकच उग्र बनवले होते.


चालून चालून रसरसून दुखणारे आपले पाय राजांनी गुडघ्यामध्ये मुडपले. अन् आपला माथा त्या रानदेवीच्या पावलांवर ठेवला. तिथेच बाजूच्या उघड्या गवतातल्या दगडावरच तो लोकहितकारी राजा क्षणभर निवांत बसला. रात्रभराच्या अखंड चालीने सर्वांच्या पायाच्या नळ्या तापल्यासारख्या झाल्या होत्या. सारे हाशहुश करत होते. तेवढ्यात विशीतली एक तरुण पोर तिथे धावत आत आली. तिने आपले डोके शिवरायांच्या पायावर ठेवले. राजांनी अंधूक चंद्रप्रकाशात तिच्याकडे रोखून पाहिले. थोड्याच वेळात त्यांच्या ध्यानात आले, ती गुणामावशीची सून लक्ष्मी आहे. कालच सकाळी जंगलराने तुडवत राजांच्या स्वागताची आगाऊ तयारी करण्यासाठी ती पुढे पाटेवाडीला येऊन पोचली होती. गुणामावशीच्या सख्ख्या बहिणीचा तो गाव होता.

लक्ष्मीसोबतच त्या बाजूच्या वाडीतल्या आणि पल्याडच्या दोन-तीन छोटेखानी गावांतल्या माता-भगिनी तिथे बुट्ट्यापाट्या घेऊन अंगावरचा पाऊस झेलत आणि पायाखालच्या काट्याकुट्यांशी तसेच सापाकिरडांशी सामना करीत रात्रीच्याच तिथे गोळा झाल्या होत्या. त्यांनी राजांच्या फौजेसाठी नाचणीच्या भाकऱ्या,कांद्याचे गड्डे आणि लाल चटणी आणली होती. ते बघून बाजीप्रभूंना कसलीशी आठवण झाली. त्यांनी सर्वांना हटकले,''आटपा लवकर. कमरेच्या फडक्यात बांधलेल्या भाकरी बाहेर काढा!''

त्या दुर्धर रस्त्यावर कोणताही प्रसंग ओढवू शकतो,हे लक्षात घेऊनच राजांनी पन्हाळगड सोडताना आगाऊ तजवीज केली होती. गुराख्यांसारख्या

## नवी संहिता... नवा आशय...


## अश्विन सांघी यांची २ नवीन पुस्तके




# दि रोझाबल लाइन

अनुवाद
**संकेत दि. लाड**

सर्व धर्मांच्या परस्पर संबंधांची नाळ उलगडत जाणारी अश्विन सांघी यांची अभ्यासपूर्ण कादंबरी
किंमत ५५०/-रु




# सियालकोट गाथा

अनुवाद
**तृप्ती कुलकर्णी**

फाळणीच्या दर्दभऱ्या अनुभवांमधून प्रवास करत नवं समाजभान निर्माण करणारी कादंबरी
किंमत ६००/-रु

**पोस्टेज अतिरिक्त। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

लांब धडप्यात भाकरी आणि झुणका बांधून ते धडपे प्रत्येकाने आपल्या पाठीशी कमरेबरोबर बांधून घेतले होते; पण रात्रभराचा पाऊस,वाटेत अनेक ठिकाणी ओलांडलेले भरभरून वाहणारे ओढे, ओघळ, कधी कधी तर छातीएवढ्या पाण्यातला प्रवास. त्या साऱ्या अडचणींचा परिणाम म्हणून त्यांच्या कनवटीची ती शिदोरी-त्या ज्वारीच्या भाकऱ्या पाण्याने भिजून त्यांचा पिठूळ लगदा बनला होता.

बरे झाले लक्ष्मी आणि गुणामावशी मदतीला धावल्या! त्यांच्यामुळेच आणि राजांचा महिमा ऐकून त्या पंचक्रोशीतील माय-भगिनींनी त्यांच्यासाठी नाचणीच्या भाकरी आणि कांदेमिरच्या असा मेवाच आणला होता. रुचकर नाचणीची भाकर खाताना सारे खुश झाले. रात्रभर चालून श्रमलेल्या जिवांच्या कडाडत्या भुकेला ती चवदार नाचणीची भाकर अमृतापेक्षा गोड वाटली.

सर्व जण घाईने घास पोटात ढकलत होते. राजांच्या मनी गुणामावशी, लक्ष्मी आणि सोबत ओलेले वाटाडे तरुण ह्या सर्वांबद्दलच कृतज्ञतेचा भाव दाटून आला होता. त्यांनी लक्ष्मीला विचारले, ''बाळ, एवढ्या दूर अंतरावरून काल इकडं तू पोचलीसच कशी?''

''म्हाराज! तशी वाट पायाखालचीच हुती.''

''सोबत कोण कोण आलं आहे?''

''आत्याबाय तुमच्याबर तिकडं गडावरच गुंतलेल्या. बाकीचे घरातले गाईगुरांसाठी थांबले. मग मी एकटीच आली तरातरा चालीनं.''

''भीती नाही वाटली?''

''कशासाठनं भ्यायचं? ह्या पावसाळी दिवसांत हिथं वाघबी चार-चार महिने नाईत आपल्या गुहेबाहेर पडत. आन् ते गवे आन् रानडुकरं म्हणाल तर ती फकस्त पहाटं पहाटं पीक हादडायला बाहेर पडत्यात. मग दिवसा भ्याचं कशासाठनं? आली आपली पळत वाऱ्यासंग भिंगरीसारखी!''

राजांचा तर अभिमानाने ऊरच भरून आला. त्यांनी लक्ष्मीकडे नीट बघितले. तिच्या कपाळावर कुंकू नव्हते. तिने याआधीच हिंदवी स्वराज्यासाठी प्रतापगडाच्या लढाईत आपल्या कुंकवाचा करंडा सांडला होता. उघड्या कपाळाने आता ती स्वराज्यासाठी राबत होती. त्याचवेळी शंभुजीने आपल्या गाठोड्यातील जराशी कोरडी शाल बाहेर काढली. ती त्याने राजांना काचोळीच्या आत लपेटून घ्यायला भाग पाडली. राजांना पाऊसवारा बाधू नये, याची तो एकीकडे काळजी घेत होता. त्याचवेळी राजे काही क्षण त्या आवारात टेकल्याची त्याने संधी

साधली.रात्रभर गुडघाभर चिखलापावसात चालून चालून राजांच्या पायांचे तळवे पांढरेफटक पडले होते.दगडगोटे लागून पायांवर काही ओरखडे आणि छेदही उठले होते.स्वत:जवळच्या कुपीतील मोहरीच्या तेलाने शंभुजीने मायेने आपल्या राजांचे तळवे चोळले. एकाएकी राजांच्याच मनात मेघांनी दाटी केली. त्यांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहू लागले. त्याबरोबर बाजीप्रभूंनी झट्कन राजांचा हात पकडला.तिथेच हिरव्या गवतावर गुडघ्यावर बसत,ओणवे होऊन बाजीप्रभू कळकळून बोलले,"महाराज! आम्ही जित्ते असताना आपल्या डोळ्यांत पाणी?"

"बाजीदा ऽऽ हे अश्रू दु:खाचे नव्हेत,साफल्याचे आहेत."

"म्हणजे हो—?"

राजांनी त्या अर्धवट अंधारात आपल्याभोवती बसलेल्या आपल्या सहकाऱ्यांकडे बघितले. काळजात अनोख्या भविष्याची ऊब घेऊन ओल्या गवतात बसलेले ते सोबती. त्यांच्यावरून नजर फिरवताना राजांचा ऊर भरून आला. ते बोलले, "सवंगड्यांनो ऽ आपण सारे आम्हास देव मानता; मात्र आम्ही आहोत, तुमच्यासारखाच एक हाडामांसाचा गोळा. भवानीच्या कृपेने आमच्या जीवनात एक आक्रीत घडलं. रयतेचं दु:खदैन्य, त्यांच्यावर प्रत्यही घडणारा अन्याय— कधी सुलतानीचा तर कधी अस्मानीचा, ती सारी संकटं तुमच्यासंगे झेलताना वाटेत मानवता नावाची देवता आम्हास भेटली. तिने राजधर्म शिकवला. तीच राजधर्म नावाची जाणीव आमचं बोट धरून आम्हास कार्यास जुंपते. ह्या मातीतल्या ह्या डोंगरी भाबड्या माणसांचं प्रेम, हा लळाजिव्हाळा बघून आमच्याही अंगामध्ये पहाडाचं काठिण्य आलं,मनाला सागराची अथांगता लाभली,वाऱ्याकडून गती मिळाली आणि अस्मानीच्या ताऱ्यांकडून समाजाचं देणं देण्याची दूरदृष्टी मिळाली. तुम्हा सर्वांची आमच्यावरची, आमच्या हिंदवी स्वराज्यावरची प्रीती हेच आमचं खरं सामर्थ्य आणि हीच संपत्ती आहे!ह्या भाबड्या रयतेच्या ऋणातून आम्ही कसं उतराई व्हायचं हो बाजीदा?" राजांच्या बोलांनी सगळेच गहिवरले.

राजांनी कष्टाने आपले अश्रू पुसले.अजून वाट खूप शिल्लक होती. त्यांनी आपल्या सोबतच्या एका मावळ्याला जवळ बोलावले. त्याच्या डोक्यावर खजिन्याचे एक गाठोडे होते. शिवरायांनी त्यामध्ये हात घालत मुठीने आतल्या सुवर्णमोहरा बाहेर काढल्या. प्रत्येक माता-भगिनीच्या हातावर मोहरा ठेवल्या, तेव्हा पोरीबाळी लाजल्या. त्या नको नको म्हणत होत्या; पण राजांनी सर्वांना

वडीलकीच्या नात्याने दटावले. दागिन्यांनी भरलेल्या दोन ओंजळी लक्ष्मीच्या पदरात बांधल्या. गुणवंता मावशीला नमस्कार सांगितला.

"जय पावडाई माता ऽऽ" कोणीतरी दबक्या आवाजात जयघोष केला. तसे खाली चरमाडावर बसलेले मावळे तडक उठले. पुन्हा पायाला भिंगरी बांधून धावत पुढे निघायचे होते. आता रात्रीला पहाटवाऱ्याचा सुगावा लागला होता. राजे बाजीप्रभूसह सर्वांना खुल्या दिलाने पुढची दिशा सांगू लागले, "बाजीदा, यापुढं उरला दीड-दोन तासांचा प्रवास. मग पलीकडे चौकीजवळ म्हणजेच पांढरे पाणी नावाच्या गावाजवळ आपण पोचू."

"चला, लगेच निघू."

"तिथे मात्र थोडं थांबून वाऱ्याचा आणि वैऱ्याचा नीट अंदाज घ्यावा लागेल. मग लगेचच जलदीने विशाळगडाकडे आगेकूच करू!"

"म्हणजे त्या गडावरच सकाळची न्याहरी उरकायचा राजांचा बेत दिसतो!" फुलाजीच्या त्या टिपणीवर बाकी सारे दिलखुलास हसले.

पावडाई देवीच्या समोरची दगडी ठावक्यातली ती पणती पहाटवाऱ्याचा सुगावा लागून फरफरत होती. त्या लालओलसर प्रकाशात सतरा-अठरा वर्षांच्या फुलाजीप्रभूंच्या ओठावरची मिशीची कोवळी लव चांगली चमकदार दिसत होती.

सह्याद्रीच्या त्या घनदाट कच्च हिरव्या जंगलरानातला तो चिमुकला गाव. वस्ती फक्त ३०-४० घरांची. पावसाच्या उभ्या तडाख्यात सलग चार महिने काढावे लागायचे. त्यामुळे सगळी घरे थेट उतरत्या छपराची. कुडचाभर पाणी वर ओतले तरी ते झट्कन पावळणीतून खाली वाहत गेले पाहिजे, अशा लांब, दाट गवतांच्या शाकारणीतून बनवली गेलेली. त्या भल्या सकाळी रात्रीचा पडदा फाडत तिथे सोळा-सतरा घोडी पोचली होती, ज्यांनी भर रात्री राजांचा पन्हाळगडच्या बगलेच्या वाहत्या ओढ्याजवळ निरोप घेतला होता.

ओढ्याकाठची ती हिरवट चरमाटाची मोकळी जागा. ओढ्यातून, दगडधोंड्यांतून पाण्याच्या धावत्या प्रवाहाचा एकसारखा खळखळ असा चैतन्यमय आवाज कानावर आदळत होता. घोडी भरधाव धावू लागल्यावर त्यांच्या खुरांचा एक नादमय ध्वनी जसा उमटतो, तसेच चैतन्याचे गाणे तो ओढा गात होता. त्या सोळा-सतरा घोडेस्वारांनी आपल्या जनावरांच्या पाठीवरून पटपट खाली उड्या

घेतल्या. रात्रभराच्या प्रवासाने आळसावलेल्या अंगाला आळोखेपिळोखे दिले. चौफेर नजर टाकली. भोवतीच्या साऱ्या रानावर प्रचंड झाडाझुडुपांची गस्त होती. त्या पांढरे पाणी नावाच्या गावाजवळच थोडीफार काय ती उघडी शेती दिसत होती.

नजर जाईल तिकडे उंच खडे पहाड होते. पलीकडून कोकणच्या बाजूने अणुस्कुऱ्याचा घाट चढून थकून येणारी अरुंद वाट याच गावावरून तरुतुरु चालणाऱ्या म्हातारीसारखी पुढे मलकापुराकडे सरकत होती. मावळतीच्या अंगाला त्या हिरव्या बनात चार कोसांवर विशाळगडाचे कडे लपले होते.

एका घोडेस्वाराने आपल्या जनावराच्या पाठीवर बांधलेले एक रेशीमवस्त्राचे बोचके बाहेर काढले. त्यामध्ये शिवरायांचा पोषाख होता. ते सारे उगवतीकडून खाली उतरणाऱ्या डोंगर पठाराकडे टक लावून बघू लागले. आताशा कुठे पावसाच्या सरी थांबल्या होत्या. आभाळातले काळेशार ढग फाकून ते आता थोडे निळे दिसू लागले होते. भिजलेल्या पाखराने आपले पंख झाडावेत,तसे रानातल्या झाडांच्या पानांवरून पाऊसपाण्याचे उरले थेंब हळूहळू खाली गळत निथळत होते.

ते सारे घोडेस्वार आपली जनावरे घेऊन ओढ्यातल्या पाण्यात उतरले. काही जनावरांनी पाण्याला तोंड लावले. बाकीची काठावरचे ओले गवत आपल्या लांब जिभेने ओढून खाऊ लागली. तोवर त्या घोडेस्वारांची नजर पूर्व दिशेकडे वळली. हिरव्या झाडीतून समोरचा माळ उतरत येणारे पायदळ दिसू लागले. ढग, पाऊस आणि आख्खी रात्र पाठीवर बांधून वेगाने धावत आलेले ते सातशे मराठा वीर. समोरचे लवण ओलांडत ते पुन्हा पुढे लंब्या टांगा टाकत धावत-पळत येताना दिसले.

इकडचा एक घोडेस्वार खुशीने हसला. मोठ्या समाधानाने बोलला,''बरं झालं, वेळेत पोचलो!''

राजे अपेक्षेप्रमाणे तिथे वेळेत दाखल झाले. रात्रभर चिखलापावसातून आगेकूच करताना राजे अनेकदा पाण्याने, घामाने भिजले होते. वाटेतल्या नद्यानाले ओलांडताना त्यांना कैक वेळा चिखलगाळाशी सामना करावा लागला होता. सततच्या दौडीने त्यांचे अंग अगदी शिणून गेले होते. अंगावरच्या कुणबाऊ बंडीत आणि तुमान-पागोट्यात राजे अगदी माळकरी दिसत होते. त्यांनी ओढ्यातल्या थंडगार पाण्यात घाईने स्नान आटोपले. तिथेच झाडाच्या

आडोशाला वस्त्रे बदलली. हुजऱ्या बाबू परिटाने आणि त्याच्या सेवकांनी राजांना वस्त्रालंकार चढविण्यासाठी मदत केली.

अंगावरची ती दिमाखदार रेशमी वस्त्रे, तो सोनेरी कमरदाब आणि डोक्यावरचा मंदील. त्यावर लखलखती रत्नमाळ. ओढ्याच्या काठावरून राजांनी खाली धावत्या पाण्यात स्वत:ची हलती प्रतिमा बघून घेतली. तितक्यात पलीकडच्या हिरव्या झाडीतून एका रानपाखराचा कर्कश वेदनामय आवाज घुमला. तशी राजांनी खालच्या दिशेला नजर टाकली, तेव्हा एका विस्मयाच्या तडाख्याने त्यांच्या शरीराचा गोठून पुतळा झाला. ते अवाक् होऊन समोर पाहतच राहिले. तसे बाजीप्रभू राजांच्या जवळ सरकले. त्यांनी कंपभऱ्या आवाजात विचारले, ''राजे, काय झालं काय?''

राजे तसेच खांबासारखे खडे होते. एक-दोन क्षणच. मग बाजींकडे नजर टाकत त्यांनी दूर टेकडीकडे त्यांचे लक्ष वेधले. अचानक त्या बसक्या डोंगराच्या माथ्यावर अनेक आदिलशाही घोडी उगवताना दिसू लागली होती.

''अरे बाप रे! एवढ्या सकाळी?—अशी पाठोपाठ दुश्मनांची पथकं इथवर पोचतातच कशी राजे?''

'आपण अशा मुलखात आणि अशी झेप घेऊ की आपला नेमका ठावठिकाणा समजण्यासाठीसुद्धा गनिमाला किमान पाच-सहा दिवस लागतील,' हे राजांचे पन्हाळ्यावरच्या निरोपाच्या वेळचे खात्रीचे उद्‌गार अजूनही प्रत्येकाच्या कानात रुंजी घालत होते. त्यामुळेच राजांच्या सोबतचे ते सातशे वीरसुद्धा चमकले. बावरले. आजूबाजूच्या जंगलझाडीकडे पुन्हापुन्हा धास्तावल्यासारखे बघू लागले. तेवढ्यात न राहवून राजांच्याच मुखातून उद्‌गार बाहेर पडले, ''बाजीदा ऽ असं होत्याचं नव्हतं का व्हावं? एवढ्या कमी अवधीत,अशी दुरून वळसे घेऊन दुश्मनाची जनावरं पाठोपाठ अन् टाकोटाक इथवर पोचावीतच कशी?''

''राजे?''

''होय बाजीदा, आमच्यापैकी कोणीतरी 'दगा' दिला आहे खास!''

''करू देत दगा—पण ह्या बाजीसारख्या सहस्त्रावधी मावळ्यांच्या काळजाच्या कुपीत आमच्या राजांसाठी केवढी जागा आहे, हे दाखवायचा वखत जवळ येऊन ठेपला आहे! तमा नाही. राजे ऽ आपलं जीवित महत्त्वाचं. आपण निघावं, बाकीचं आम्ही बघतो.'' बाजीप्रभूंच्या अंगातले रक्त खवळून उठले

होते. त्यांची कानशिले गरम झाली होती.

रात्रीच्या पथकातले टेहळणीसाठी मागे राहिलेले तीन घोडेस्वार मलकापूरच्याच मार्गाने परळ्याजवळची खिंड ओलांडून पुढे धावत येताना दिसले. त्या सकाळच्या गारठ्यातही ते घामाघूम होऊन निथळत होते. आपल्या जनावरांवरून पटापट उड्या घेत ते राजांना सामोरे आले. सटासट मुजरे करत घाबऱ्याघुबऱ्या आवाजात सांगू लागले, ''राजे, घात झाला. गनिम इकडंच धावतोय. अगदी पाठोपाठ.''

''किती घोडी आहेत?'' राजांचा प्रश्न.

''असतील किमान साडेतीन ते चार हजार.''

''अरे, पण आहेत तरी कोण?—काही सुगावा?''

''त्या जोहरचा जावई सिद्दी मसूद, त्याच्या संगट आणखी पाच-सहा सरदार असत्याल.''

''आपल्यातलं कोणी —?''

''नाहीत कसे? गोणपाटाच्या खोळी डोक्यावर ठेवून त्यात आपली पापी थोबाडं लपवत खानासंगं येताहेत ते दोघे-तिघे मराठा दगाबाज—खानाला वाट दाखवत.''

राजांची चर्या भावनेने ओथंबून गेली. मरणाची भीती त्यांच्या जिवाला कधीच नव्हती; परंतु आत्ता कुठे रांगू लागलेले बाळरूपातले स्वराज्य नेस्तनाबूत होऊ देणे कदापिही परवडणारे नव्हते. त्यासाठी तर त्या सर्व बहाद्दुरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करत ती भयानक रात्र कंठली होती. विचार करायलाही वेळ नव्हता. अजगर पुढे सरकत होता. आपले राज्य आणि आपला राजा वाचवणे, त्यासाठी झुंज देणे क्रमप्राप्त होते. ओढ्याच्या पाठीमागेच घोडखिंडीचे मुख होते. तिथून आत जाताना सरकणारी ती सहा फर्लांगाची घोडखिंड!

आता प्राप्त परिस्थितीमध्ये दुश्मनाला खिंडीच्या तोंडाशी रोखून धरणे गरजेचे होते.

शिवराय आणि त्यांचे पंधरा-सोळा निवडक सहकारी झट्‌कन घोड्यावर बसले. राजांनी सहकाऱ्यांना निम्मे निम्मे विभागून नियोजन केले. वादळासारख्या धावून येणाऱ्या वैऱ्याला अडवण्यासाठी निम्म्यांनी खिंड लढवायचे ठरवले. उरलेले सर्व जण राजांचे संरक्षण करत तासाभराची वाट चालून विशाळगडावर पोचणार होते.

“शंभुजी ऽ चला निघा तुम्ही आमच्याबरोबर!” राजे बोलले.

शंभुजी जाधव थबकला. त्याने खिंडीच्या तोंडाशी एकवटलेली ती तीनशेभर मावळ्यांची फौज बघितली. झाडीच्या पल्याड नजर टाकली. खालच्या दरीतून धावत येणारे हजारो आदिलशाही सैनिक दिसत होते. राजांना सुरक्षितरीत्या पुढे जाऊ द्यायचे, तर दुश्मनाच्या ह्या लोंढ्याला बांध घालणे आवश्यक होते. जिजाऊमाउलीने शंभुजीला अनेकवार बजावून सांगितले होते, “बाळा शंभू ऽ तू आमच्या शिवबाच्या संगतीने असतोस. त्यामुळेच मला घोर वाटत नाही. कायम रक्षण कर आपल्या लाखांच्या पोशिंद्याचं.”

ती सारी वचने, इच्छा-आकांक्षा लक्षात घेऊन शंभुजी कडाडले, “शिवाजीदादा, सिंदखेडच्या जाधवांची औलाद आहे ही. जेव्हा जेव्हा स्वराज्यावर दांडगं संकट येतं, तेव्हा संकटाच्या काळदरीत उडी घ्यायला आमच्या रक्ताला स्फुरण चढतं. खुशाल आपण पुढे व्हावं राजे! आम्ही खिंडीच्या तोंडाशीच थांबतो.” शंभुजीचा खिंड लढवायचा निर्धार पक्का होता.

“अन् बाजीदा, आपण काय करताहात? येता आमच्यासोबत?”

“महाराज ऽ बृहस्पतीसारखे ज्ञानी आपण, असं भलतंच काय बोलता ऽ! हत्तीच्या पिलांना ज्वारीचं पोतं समजून अंगाखांद्यावरून खेळवणारा हिम्मतबाज बाजी, अशी माझी हिरडस मावळात ख्याती आहे. त्यामुळेच खिंडीच्या ह्या तोंडाजवळ आदिलशाही सैनिकांच्या मुंडक्यांचा खच पाडायचा सोडून मी कसा धावू तुम्हासोबत?”

“आता आमचं मत नका विचारू राजे! मीही आमच्या मावळातल्या तीनशे बांदल फाकड्यांसोबत ह्या खिंडीला रक्ताचा नैवेद्य घालेन. आपण खुशाल पुढे निघावं!” रायाजी बांदलाने भरवसा दिला.

“राजे! आपण हे असं खोळंबून उभं राहू नये! आपण निघावं, झडकरी निघावं,” बाजी, फुलाजी, शंभुजी आणि रायाजी बांदलांसह साऱ्यांनी राजांना कळकळीने सांगितले आणि आपल्या कंठातून, “हर हर महादेव!”चा रणघोष सुरू केला.

निरोपाच्या वेळी राजांच्या चेहऱ्यावर पावसाळी ढगांचे सावट दिसू लागले. ते काळजीच्या जड आवाजात बोलले, “अहो बाजीदा, दुश्मनाची संख्या त्या मानाने थोडी जास्तीच दिसते.”

“त्याची चिंता तुम्हाआम्हाला नको. आमच्या हातातली शस्त्रंच ती कामगिरी

पार पाडतील. हिरडस मावळाच्या मातीत उगवलेला माझ्या सोबतीचा एकेक बांदल दहा-दहा, पंधरा-पंधरा जणांना भारी आहे. काळजी नसावी. आपण निघावं!'' बाजीप्रभूंनी सांगितले.

आता समोरच्या टेकडीवरून खाली धावत उतरणारी गनिमाची फौज गिल्ला करू लागली होती. कदाचित त्या भुतावळीस खिंडीच्या तोंडी खडे असलेले राजांचे दल लांबून दिसले असावे. त्यामुळेच चेव चढून 'दीन दीन' असे ओरडत तो जमाव वेगाने इकडे धावत निघाला होता. वेळ सरत होती. बाजीप्रभूंचा निरोप घेताना राजांच्या काळजावरचा दगड बाजूला होत नव्हता. त्यांनी घोडा हाकारला. हाळीसारखा आवाज देत ते बोलले, ''चलतो बाजीदा ऽऽ झुंजार झुंज द्या. आम्ही गडावर पोचताच तोफांना बत्ती देऊ. पाच तोफांचा धूमधडाड आवाज कानी येईपर्यंत लढत राहा. दुश्मनाला रोखा. घोडखिंडीतच ठोका!''

''राजे, आपण झडकरी निघावं! हिंदवी स्वराज्यासाठी मरणाचा मुका घ्यायला या बाजीचे ओठ इकडं केव्हाचे शिवशिवायला लागलेत महाराज ऽ!''

''बा-जी—''

''महाराज! अजिबात नका करू पर्वा माझी. अहो, माझ्या मरणानं माझी लेकरंबाळं उघडी पडलीत तरी चालेल; पण तुमच्या जगण्यानं मराठ्यांच्या शंभर पिढ्यांचं दळींदर दूर होईल! कोण भितो त्या मरणाला ऽ!'' बाजीप्रभू गरजले.

राजांचा घोडा पुढे धावताधावता मध्येच अर्धगोलाकार वळण घेऊन मागे वळला. त्यांचा तो अश्वसुद्धा भावभऱ्या डोळ्यांनी बाजींकडे टकमका बघत होता जणू. बाजीप्रभू पुढे धावले. त्यांनी राजांच्या घोड्याचे मुस्कट पकडले आणि लाडाने ते आपल्या चौड्या छातीबरोबर घट्ट दाबून धरले, तेव्हा घोड्यावरूनच राजे ओणवे झाले. बाजींची आणि राजांची गळाभेट झाली. राजांच्या सोबतचे साडेतीनशे वीर झपाट्याने समोरच्या झाडीतून पुढच्या मार्गाला लागले.

बाजींनी दुश्मनाच्या दिशेने मोहरा वळवला अन् कमरेची तलवार म्यानाबाहेर उपसली.

बाजींच्या अंगात आता शौर्याची नशा संचारली होती. ते दुश्मनाच्या समाचारासाठी सज्ज झाले.

सिद्दी जोहर अत्यंत वैतागलेल्या, उद्विग्न अवस्थेत आपल्या डेऱ्याबाहेर काळोखातच बसून होता. आता पाऊस थांबून फक्त थंडगार वारा वाहत होता. त्याचे सहकारी अंमलदारही खोळंबून थांबले होते. काल सकाळपर्यंत गोडगोड खलिते पाठवून बेसावध ठेवणाऱ्या शिवाजीराजाने त्या सर्वांना चांगलाच तडाखा ठेवून दिला होता. त्या ठणकत्या वेदना साहवत नव्हत्या.

तोवर पलीकडून दीडदोनशे घोडी अंधार तुडवत धावत आली. साठीतल्या पण अजून देखूणपण टिकवलेल्या कोरीव दाढीच्या बाजीराजे घोरपड्यांनी घोड्यावरून खाली उडी घेतली. त्यांना मशालीच्या प्रकाशात बघताच जोहर उठला. मोठ्याने रडवेला सूर काढत बोलला, ''आईये बाजीराजे! देखिए, हमारी नैया तो डूब गई! आता अली आदिलशहांना तोंड कसं दाखवायचं?''

''अरे खानसाब ऽ याआधी त्या विजापुरापासून मी सर्वांच्या कानीकपाळी हेच ओरडून सांगत होतो. शहाजीचा तो दिवटा शिवाजी नौटंकी करण्यासाठीच प्रसिद्ध आहे!''

''लेकिन अब तो सिवा निकल गया! माने सारा कुछ खतम हो गया भाई! डोक्यावरून पाणी गेलं.''

''अरे खानमियाँ, तुम्ही समजता तशी अगदीच काही धरणी कंप नाही पावलेली. त्यात तुमच्या अल्लाने तुम्हाला सही जावई शोधून दिलाय—योग्य त्या मार्गाने मसूदने भरारी मारत सिवाची पाठ धरलीय—कदाचित शिवाजी त्याला सापडूही शकतो—''

''क्या बकते हो—तो खैर खुदाकी और तकदीर इस जोहरकी!'' त्या थोड्याशा सुखकारक बातमीने सिद्दी जोहर चेकाळून उद्‌गारला. त्याने घोरपड्यांना उलटे विचारले,''तो घोरपडे,आप भी उनके साथ क्यूँ नहीं चले गये? का स्वत:ची कातडी बचावत थांबलात?''

''हां हां खानसाब! तुमचे शब्द आधी मागे घ्या.त्या शहाजी भोसल्याची कुळी, मुळी, डहाळी खतम् होणार असेल तर हा घोरपडा पेटलेल्या सरणावरनं-सुद्धा तत्काळ उठेल—काय समजता काय तुम्ही आम्हाला?''

''तर मग का गेला नाहीत मसूदसोबत?'' सिद्दीने चिरडीला येऊन विचारले.


''मी मसूदला उत्तम वाटाडे दिलेत, जे त्याला योग्य त्या ठिकाणावर टाकोटाक घेऊन जातील. अहो, आम्ही मुधोळकर दर वर्षी दोन महिने पन्हाळ्यावर

## नवी संहिता... नवा आशय...

# धर्म आणि समलैंगिकता

**देवदत्त पट्टनायक**

अनुवाद **सोनाली नवांगुळ**





समलैंगिकते भोवतीचं अज्ञानाचं वलय दूर करत जगभरातील धर्मांचा देवदत्त पट्टनायक यांनी घेतलेला सांगोपांग आढावा

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# झुंड

**बाबाराव मुसळे**




सत्ताकारणाच्या क्रूर चक्रव्यूहाचा सामूहिक ताकदीनं सामना करण्याचं तंत्र शिकविणारी नवीकोरी कादंबरी

**किंमत : ५८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

तुमच्या 'आदिलशाही मंझिल' महालात मुक्काम ठोकून असतो—शिकारीसाठी इथल्या वाटा, आडवाटा, खिंडी अन् गवंड आमच्याइतके कोणाला माहीत असणार—?''

''फिर भी आप चले जाते थे तो—?''

''काय करणार? शिवाजीराजांना एकट्याने गिरफदार करून, हा फतेह फक्त माझाच आहे, असं जगापुढे सांगत मिरवण्याच्या स्वप्नाइतकं आत्मविश्वासाचं पाणी चढलं होतं तुमच्या जावयाच्या अंगात! म्हणून तर तो बंदा आम्हाला अकेला टाकून धावला तिकडे—''

''लेकिन घोरपडे, बात बन तो सकती है ना?''

''बिगड भी सकती है—''

''अल्ला ऽऽ क्या बक रहे हो?''

''त्या भीतीपोटी तर रातचाच तुमच्याकडं हा असा धावत आलो—''

''तो बताईये, फर्माइये?''

''मसूदसोबत फक्त साडेतीन हजार घोडी धावलीत, तेवढ्याने तो शिवाजी आवरेल असं वाटत नाही मला—''

''तो फिर?''

''किमान अजून तेवढीच फौज लगेच धाडा त्याच्या मदतीला; कारण तो आमच्या शहाजीचा पोरगा लढाऊ बहाद्दूर आहेच; पण त्याच्या तलवारीच्या पात्यापेक्षा त्याची खोपडी जादा तल्लख आहे—ती तोफेच्या गोळ्यासारखी धमाका उडवू शकते. म्हणूनच द्या शिबंदी लगेच पाठवून मसूदच्या मदतीला—कोणच्या रानवाटेनं कसं लगेच धावायचं त्यासाठी माझे वाटाडे अन् हरकारे राहतीलच सोबत—''

आपली राखीव फौज मसूदच्या मदतीस पाठवायच्या विचाराने जोहर उत्साहाने रसरसला आणि अंमलदारांना आदेश देऊ लागला. भांबावल्यासारखा उभा राहिलेल्या फाजलखानाला बघून तो तडकला,''अरे फाजल, बेवकूफ ऽऽ अभी तू क्यूँ चुपचाप खडा है? हमेशा बदला चाहता है ना? चल, फौज लेकर वहाँ भाग जा! मत भूल! सिवाने माझ्या बापाचा नव्हे तुझ्या बापाचा कोथळा फाडलाय!''

## पांढरे पाणी, तांबडी खिंड

ऊन चढणीला लागले. सिद्दी मसूदच्या नेतृत्वात गिल्ला करत येऊन पोचलेली साडेतीन हजार आदिलशाही घोडी खिंडीच्या समोरच्या अंगाने धावून येऊ लागली. जोरकस पाठलागाच्या इराद्याने झेपावलेल्या त्या घोड्यांनी झट्कन वाहत्या ओढ्यामध्ये उड्या घेतल्या, अन् ओढ्यातले पाणी उडवत ती बेधुंद जनावरे एकदाची घोडखिंडीच्या मुखाजवळ येऊन धडकली.

खिंडीच्या तोंडाशी येताच आजूबाजूचा उभा चढ बघून आदिलशाही स्वार काही क्षण तिथेच घुटमळले. इथून पुढची खिंडवाट अगदीच अरुंद, म्हणजे एका वेळी तीन-चार घोडीच कशीबशी पुढे सरकतील अशा नळीसारख्या चिंचोळ्या आकाराची होती. ती घोडखिंडीची नैसर्गिक घळई तिथून पुढे सहा फर्लांग तशाच पद्धतीने आत पसरली होती.

त्या खिंडीजवळ अगदी थोड्याच अंतरावर आपल्या घोड्यावरून गिल्ला करत सिद्दी मसूद तिथे येऊन धडकला.अखेर शिवाजीच्या सैन्याला आपण ह्या जंगलरानात गाठण्यात कामयाब झालो, या खुशीने तो पागल झाला होता. त्या जोशातच आपल्या हातामधल्या तलवारी उंचावत त्याच्या फौजेने पुढे झेप घेतली. तशी मावळ्यांनीही आपल्या हातातली शस्त्रे सरसावली. ते सारे मोठ्या जिद्दीने खिंडीच्या तोंडाशीच गनिमाच्या अंगावर धावून गेले. जोरदार खणाखणीला सुरुवात झाली.

आरंभी त्वेषाने धावून आलेल्या आदिलशाही घोडेस्वारांना मराठा पायदळाने तीव्र प्रतिकार केला, तसा त्यांचा काहीसा हिरमोड झाला. मराठ्यांच्या तुकडीच्या अंगावर अशा त्वेषाने धावणे म्हणजे जणू वाघांच्या मुखात जाऊन अडकणे, ही गोष्ट सिद्दी मसूदच्या लगेचच लक्षात आली. त्यामुळे काही पावले मागे सरकून पुन्हा बाजीप्रभूंच्या तुकडीवर पुरेशा तयारीने आदळण्याची योजना तो बनवू लागला.

शिवराय विशाळगडावर जाऊन पोचेपर्यंत आणि तिकडून सलामीच्या तोफांचे ध्वनी कानावर आदळेपर्यंत मराठा वीरांनासुद्धा बचावाचीच लढाई खेळायची होती. त्यामुळेच बाजीच्या साथीदारांनी खिंडीच्या तोंडाशी जलद हालचाल केली. प्रत्येक जणाने स्वत:साठी मोक्याची जागा पकडायला सुरुवात केली. त्या समयी रायाजी बांदल म्हणाला, ‘‘बाजीदा, नीट बघितलंत नव्हे,

तिकडून मध्यरातीच्या सुमारास येवढ्या उशिरानं आगेकूच करूनसुद्धा वैरी इथं पोचला कसा? तोही तीन-चार हजार घोडी संगतीला घेऊन?''

''होय रे राजा, ते चार हजार अन् आपण फक्त साडेतीनशे! म्हणूनच सांगतो गड्यांनो! आपल्या एकेक वीराला समोरच्या दहा-दहा जवानांना पाणी पाजावंच लागेल. तरच ह्या अडनिड्या झुंजीत आपण टिकून राहू.''

''होय बाजीदादा, कोणत्याही परिस्थितीत त्या आदिलशाही अवलादींची धूळदाण करून उरल्यासुरल्यांना मारून झोडून विजापुराकडं पळवून लावायलाच हवं!'' तरण्याबांड फुलाजीप्रभू आणि शंभुजी जाधवांनी ईर्ष्येची भाषा सुरू केली.

त्या जंगलरानात आख्खी रात्र पार केलेल्या त्या दोन्हीही फळीतल्या वीरांना अंतिम विजय स्वत:कडे खेचण्याची घाई होती. त्यामुळेच खिंडीच्या खालून वाहत्या ओढ्यातून आदिलशाही फौजींच्या तोंडातून, ''दीन ऽऽ दीन ऽऽ'', ''चलो पकडो गाझियों, पकडलो सिवा को,'' अशा गर्जना ऐकू आल्या. त्याबरोबर त्यांना तोडीस तोड उत्तर म्हणून इकडून ''हर हर महादेव ऽऽ ऽऽ'' च्या ललकाऱ्या जशा काही गगनाला भिडल्या.

पुन्हा शस्त्रास्त्रांची टिपीरघाई सुरू झाली. एकमेकांच्या अंगातले पाणी ते जोखू लागले. सलामीलाच दोन्ही बाजूच्या वीरांनी एकदुसऱ्यास तलवारींचे जोरकस तडाखे हाणले. चांगली खणाखणी जुंपली.

दुर्दैवाने एक घोटाळा घडला होता. बगळ्यासारख्या नजरेच्या सिद्दी मसूदने अचूक हेरले होते की, आपल्या फौजेच्या मानाने मावळ्यांचे बळ अगदीच तोकडे आहे. ती वस्तुस्थिती इस्लामी फौजेला समजल्यामुळे आपण मराठा पथकाला सहज कबाबासारखे भाजून काढू असा तेवर सिद्दी मसूद आपल्या वर्तनातून दाखवत होता; परंतु मराठ्यांच्या पाठीशी उभी असलेली ती दुरपास्त खिंड, ती गर्द झाडी आणि नुकताच कोसळू लागलेला पाऊस असे हुकमी निसर्गचक्र बाजीप्रभूंनी आपल्या कवेत घेतले होते. त्यामुळे तोकड्या फौजेनिशी- सुद्धा मराठा वीरांनी आदिलशाही फौजेला जोरकस प्रतिकार करायला सुरुवात केली.

बाजीप्रभू आणि रायाजी बांदलाच्या मानाने फुलाजी आणि शंभुजी हे दोघे वीर अगदीच तरणेबांड होते. त्यामुळेच फुलाजीला मदतीस घेत शंभुजी जाधवाने बाजीप्रभूंना ईर्ष्येने सांगून टाकले, ''बाजीदादा, तुम्ही पिछाडी सांभाळा. मी आणि फुलाजी साठ-सत्तर बांदल घेऊन सिंहासारखी मुसंडी मारत पुढे

घुसतो. कधीकाळी भातवडीच्या रणात शरीफजी भोसले मोगलांच्या फळीत घुसले होते, तसाच जलवा आणि तशीच करामत इथे करून दाखवतो!''

''नाही! अजिबात नाही. ते जमायचं नाही,'' बाजीप्रभूंचा तो स्पष्ट नकार बघून शंभुजी जाधव विषादाने हसू लागला, तेव्हा बाजीप्रभूंनी त्याला तितक्याच उपहासाच्या सुरात सांगितले,''हसू नको पोरा! ध्यानात ठेव, आज ह्या खिंडीच्या तोंडाशी कोणीच जित्ता राहायच्या इराद्याने उभा ठाकलेला नाही. स्वराज्यासाठी आणि शिवबांसाठी रक्ताचा मळवट भाळाला लावून आपण सगळेच मरणाच्या मांडीवर उभे आहोत! परंतु जोपर्यंत राजे गडावर पोचत नाहीत, त्याच्याआधीच सर्वांनी सलामीलाच खर्ची पडून कसं चालेल रे?''

''मग काय करायचं म्हणतोस, दादा?''

''अरे! आपल्या एकेक वीराचं शौर्य जपून,पुरवून वापरलं पाहिजे.''

थोड्याच वेळात समोरून मुसंडी मारत वैरी नव्याने धावून आला. तशा मराठा वीरांनी परस्परांना खाणाखुणा केल्या,अन् काही क्षणांतच मावळे अचानक कासरा दोन कासरे अंतर पाठीमागे सरकले. तसे खिंडीचे मोकळे तोंड बघून चवताळलेल्या अजगरासारखा गनिम आत घुसला. वैऱ्याकडे शिपायांची अलोट गर्दी दिसत होती. इकडे अचानक मावळ्यांनी दुतर्फाच्या झाडीत सांधा दिसेल तशी घुसायला सुरुवात केली. अन् काही क्षणांतच त्यांनी मोठमोठ्या वृक्षांच्या बुंध्यांचा आडोसा हीच आपली ढाल बनवली. लगेचच झाडाआडून सूं सूं करत कमठ्यातून बाण बाहेर पडू लागले आणि ते गनिमांच्या अंगात घुसून त्यांच्या रक्तमांसाचे टवके काढू लागले. बघताबघता मराठ्यांचा जोर खूप वाढला.

मावळ्यांची ती चढती बाजू बघून विजापुरी फौजेत गोंधळ उडाला. समोरून येणाऱ्या 'हर हर महादेव ऽऽ'च्या गर्जनांनी आसमंत थरारला. मावळे थोडी अधिक संख्या करून आले की गनिमांची पथके मुद्दाम गर्दी करून मोठ्या त्वेषाने पुढे घुसायची; मात्र प्रत्यक्ष भिडण्यापूर्वी खिंड मोकळी पडल्याचे बघून गनिम कावराबावरा व्हायचा. तोवर झाडीत लपलेले मावळे अचानक पिशाच्चासारखे खाली घळईत उड्या ठोकायचे. आभाळातून पडल्यासारखे किंवा अचानक भुईतून वर उगवल्यासारखे! सुरुवातीपासूनच सिद्दी मसूद अगदी भांबावून गेला होता. आपल्या दुश्मनाची चढती कमान पाहून ही भुतावळ आज नेमक्या कोणत्या झाडाचा पाला खाऊन अशा हिमतीने अंगावर कशी धावून येतेय, हेच काही त्याला कळत नव्हते.

रायाजी, शंभुजी, बाजी, फुलाजी सगळे जण इरेला पेटले होते. तलवारींची टिपीरघाई सुरू होतीच.

प्रत्यक्षात ती खिंड म्हणजे जमिनीला पडलेला एक उभा छेद होता. त्याची उंची पंचवीस हात आणि रुंदी पाच-सात हात. यामुळे ती एखाद्या अरुंद रानवाटेसारखीच दिसत होती. पांढरे पाणी या गावापासून ती खिंड काही कोस पलीकडे वळसे घेत थेट कासारी नदीच्या उगमापर्यंत पोचली होती. खिंडीतले वाहते पाणी, दोन्ही डगरींवरून कोसळलेले मोठाले पाषाण, मध्येच प्रचंड वृक्षांच्या दोन्ही अंगांनी पसरलेल्या मोठाल्या मुळ्या. या साऱ्यामुळे घोडखिंड म्हणजे मृत्यूची मोठी गुहाच बनली होती.

सुरुवातीला मावळ्यांनी बचावात्मक पवित्रा घेतला. गनिमाला बऱ्यापैकी आत खिंडीत घुसू दिला. मग मात्र त्यांनी हातातल्या गोफणींनी बेधडक तडाखे द्यायला सुरुवात केली. गोफणीमध्ये बांधलेले ते गोफणगुंडे. त्या चमड्याच्या वादी मावळे आपल्या डोईभोवती गरगर फिरवायचे आणि त्याचा असा जोरकस तडाखा समोरच्या गनिमाच्या मस्तकावर द्यायचे की, जागीच तिरीमिरी येऊन तो खाली कोसळायचा. ओढ्यातील त्या दगडांच्या टिपिऱ्यांनी दुश्मनांची कपाळे सडकून आणि सुजवून काढायला सुरुवात केली होती.

गोफणगुंड्यांचा आणि साध्या दगडफेकीचाही असा मुबलक वापर याआधी कोणीच रणांगणात केला नसेल!

मोगल आणि आदिलशाही अंमलदार मराठ्यांच्या फौजांना नेहमी माकडांची वा वानरांची फौज म्हणून नावे ठेवत; मात्र आज त्या अजब घोडखिंडीचा वापर करून मराठ्यांनी खऱ्याअर्थी आपल्या मर्कटलीला दाखवायला सुरुवात केली होती. खाली घळईत एखादा विजापुरी शिपाई टप्प्यात दिसला, तर ते वरच्या झाडाच्या फांदीवरून त्याच्या अंगावर धाडसाने खाली उडी घेत होते किंवा खिंडीच्या दोन्ही बाजूंच्या दरडीवरून घसरगुंडीसारखे अचानक खाली घसरत येत शत्रूसैनिकांचा खात्मा करत होते.

सलामीच्या धुरंधर लढवय्या वीरांमध्ये बाजीप्रभू देशपांडे होते. त्यांच्या हाती दांडपट्टा होता. निधड्या छातीने बाजी झुंजत होते. त्यांच्या हातची ती दांडपट्ट्याची पाती अशा चक्राकार गतीने गरगर फिरत होती की, बघणाऱ्यालाच भोवळ यावी. त्या तुंबळघाईमध्ये बाजीप्रभूंच्या डोक्यावरचे मुंडासे रक्ताने भिजले होते. रक्ताचे अनेक ओघळ त्यांच्या जाडजूड मिश्यांमध्येसुद्धा उतरले

होते. रक्ताघामाची, जिवाची, देहाची, कशाचीच पर्वा न करता बाजीप्रभू नावाचा तो फाकडा वीर आग ओकणाऱ्या मशालीसारखा अखंड झुंजत होता.

बाजींच्या अवतीभोवती अनेक आदिलशाही वीरांच्या मुंडक्यांचा सडा इतस्तत: कोसळून पडला होता. त्यांचा तो अचाट पराक्रम सिद्दी मसूदने बघितला, तसा तोही इरेला पडून त्यांच्या गळ्याचा घोट घेण्यासाठी मोठ्या धाडसाने पुढे पुढे सरकण्याची कोशिश करत होता. रानातला फाट्यांचा खेळ रंगण्यासाठी रबरबीत चिखलाची गरज असते. त्यावरून घसरतघसरतच खेळाडू इकडे किंवा तिकडे कोसळतात. तसेच त्या घसरणीत बरबटल्या चिखलात अचानक उभे राहतात. तसाच आदिलशाही आणि मराठा वीरांमध्ये तो रक्तमांसाचा खेळ त्या खिंडीत आज चांगलाच रंगला होता.

पलीकडच्या बाजूलाच फुलाजी आणि शंभुजी आपल्या हातच्या तलवारींनी अनेक गनिमांची खांडोळी उडवत होते. त्यांची ती मर्दानी शस्त्रे नाकाम करण्यासाठी अनेक आदिलशाही वीरदेखील त्यांच्यावर फिरून फिरून धावून जात होते. परिणामी, दुश्मनांच्या तलवारींच्या अनेक निसटत्या पात्यांनी त्या दोघा वीरांच्या अंगावरच्या वस्त्रांच्या चिंधड्या उडवल्या होत्या. त्या दोन्ही बहाद्दुरांच्या अंगावर शस्त्रास्त्रांचे निसटते वार बसून त्यांच्या जखमांतून जागोजागी रक्त ओघळताना दिसत होते.

झुंजाच्या त्या बेहोशीतच एका जुनाट वृक्षाच्या बुंध्याजवळ काही क्षण त्या दोघांना विसावा मिळाल्यासारखे झाले. दोघांच्याही अंगात रग, जंगासाठीची ईर्ष्या,सारे काही पुरेपूर होते; परंतु बरेच तास पोटात पुरेसे अन्न न गेल्यामुळे दोघांचीही पोटे खपाटीला लागली होती. शंभुजी फुलाजीला बोलला,''काय रे फुला, तुझ्या दादांनी सांगितल्याप्रमाणं दारूगोळा पुरवून अन् अंग चोरत जंग करत राहायचं का?''

''वेडा का रे तू शंभू? दादा त्यांच्या वयाच्या हिशोबाने बोलले. त्यांनी त्यांचं काम केलं; पण आपण आपल्या अंगातली रग दाबून ठेवून कसं चालेल रे?''

''खरंय दोस्ता, आता तरायचा आणि जगायचा विचारच सोडलेला बरा. ह्या खिंडीत तुझी-माझी प्रेतं पडू देत अन् दादांना आपल्या मुडद्यांच्या राशीवरून राजांना मुजरा करण्यासाठी विशाळगडाकडे निघून जाऊ दे.''

खरे तर खिंडीत लढाईला तोंड फुटण्यापूर्वी सिद्दी मसूदच्या मस्तकातला

हिसाब स्पष्ट होता. पन्हाळ्यावरची मराठ्यांची शिबंदी अगदीच किरकोळ होती. त्यातून शिवाजीराजांसोबत फार तर शे-पाचशे मावळे इथवर धावतपळत आले असतील. त्यांना बोल बोल म्हणता अर्ध्या-पाऊण तासात ह्या वाहत्या ओढ्यात गाडून मारू! परंतु वेळवखत वाढत चालला होता. मरगट्ठे हटत नव्हते. त्यांनी जीव घेऊन पळून जायचा तर सवालच दिसत नव्हता. थोड्याच वेळात ती खिंड, तो परिसर आणि मराठ्यांच्या गनिमी काव्याच्या हालचाली बघून मसूदने बरोबर अनुमान काढले, ''अल्ला ऽ यह शैतान मरगट्ठे कुदरत का सहारा लेकर जिंदगी और मौत का खेल खेल रहे हैं। यांच्यावर जमावाने धावून गेल्याशिवाय त्यांची फळी फुटणार नाही.''

मग सिद्दी मसूदने नवा डाव खेळायला सुरुवात केली. त्याने एकेका वेळेस तीनतीनशे घोडेस्वारांच्या अगर हशमांच्या झुंडी एकत्रित बांधल्या. अशा पद्धतीने किमान चार ते पाच वेळा मराठ्यांवर महाहल्ले चढवले.पाण्याच्या लाटेसारखा दुश्मन धावून येऊ लागला; परंतु मराठे बाजूच्या झाडांच्या, पाषाणांच्या, ओल्या दरडींच्या आडोशाचा वापर करत होते, मध्येच झाडझाडोऱ्यात छूमंतर झाल्यासारखे अदृश्य होत होते. लढून लढून सिद्दी मसूदचा झगा रक्ताने वारंवार बरबटत होता आणि जसा वखत वाढत होता तसा तो संतापाने कमालीचा बेभान झाला होता.जोरदार हल्ल्यांच्या तडाख्याने मराठे मरतही नव्हते आणि रणझुंजीतून मागे सरतही नव्हते.

सलग चार तास ढाली, तलवारी, भाले रक्तात न्हाऊन निघत होते. दोन्ही फौजांचे दुःख एकच होते. आदल्या रात्रीच्या चिखलपाण्यातल्या, झाडापहाडांतल्या त्या भयंकर पळापळीने,पाठलागाने सारे थकून गेले होते. मावळ्यांच्या गाठीला आता अजिबात अन्न उरले नव्हते आणि तिकडे आदिलशाही फौजेच्या मुदपाकखान्याचे लोकही त्यांच्यासोबत पोचले नव्हते. त्यामुळेच पोटात भडकलेल्या भुकेचा अजगर दोन्ही फौजांना बेजार करून सोडत होता. तहानेने आणि भुकेने हैराण झालेले ते सारे लढवय्ये आता कमालीचे थकले होते. हाशहुश करत, धाप लागून थोडा वेळ मध्येच उसंत खात होते. क्षणभराच्या विसाव्यानंतर पुन्हा उठत होते. पेटत होते.

त्या खिंडीत दोन्ही डगरींच्या पायथ्याने, मधल्या वाहत्या पाण्याच्या प्रवाहात, पाहावे तिकडे प्रेतांचे सडे पडले होते. त्या भयंकर संहाराचा सुगावा आजूबाजूच्या छोट्या छोट्या डोंगरी गावांना, वस्त्यांना लागला होता. रानातले

शेतकरी, गुरांमागचे गवळी, शेळ्यामेंढ्यांची संपत्ती सांभाळणारे धनगर सारे भीतीने गारठले होते.

त्यातच भल्या सकाळी शिवरायांची घोडी गजापूरच्या दिशेने निघून गेल्याचे अनेक गुराख्यांनी पाहिले होते, अन् शिवबांचेच मावळे पल्याड घोडखिंडीत मृत्यूचा खेळ खेळत असल्याचेही आजूबाजूच्या गरीब, डोंगरी वाड्यावस्त्यांना समजले होते.

गजापूरचा एक गावकर महादू आपली शेरडेकरडे घेऊन या बाजूला आला होता. तो झाडाझुडपांतून हळूच डोकावून लांबून खिंडीतली ती खैंदळ बघत होता. तिकडून ''हाणा ऽ हाणा ऽऽ'', ''हर हर महादेव'' ''मारो दुश्मनकों'' अशा जोरकस आरोळ्या त्याच्या कानावर पडत होत्या. मुळात ह्या मुलखीची कोकणपट्ट्याजवळची माती लाल होती. त्यातच सकाळपासून खिंडीत लाल रक्ताचे शिंपण चालू होते.

मेंढपाळ महादूने झाडाझुडुपांतून रांगत पुढे सरकत, घळईच्या कड्यावरून हळूच खाली नजर लावली. त्या खिंडीत झाडासारखा उंच, आडव्या हाडाचा, साठीपार झालेला एक लढवय्या मराठा सरदार दिसत होता. अखंड तलवारबाजीने त्याचा अंगरखा एखाद्या खाटकासारखा रक्ताने बरबटून गेला होता.

आता सततच्या भयंकर चढाईने वैतागलेले आणि अपयशाने काहीसे थकलेले आदिलशाही फौजी थोडे पाठीमागे सरले. भुकेने व्याकुळल्या स्थितीत ते मागच्याच अंगाला गटागटाने काही वेळ थांबले. भुकेने ठार वेड्या झालेल्या त्या लढवय्यांच्या हाती घोड्यांच्या चंदीच्या पिशव्या लागल्या. मग त्यांनी त्यातल्या भरडलेल्या हरभऱ्यांच्या मुठी उभ्यानेच बकबका खायला सुरुवात केली.

लढूनलढून अतिशय थकलेले बाजी क्षणभर थांबले. त्यांच्या पोटातला भुकेचा खड्डा आता गरगर फिरू लागला होता. त्यांनी बाजूनेच वाहणाऱ्या एका ओघळातले पाणी तसेच खाली वाकून बकरीसारखे पिऊन टाकले. तितक्यात पलीकडे दरडीशी लपलेल्या महादू शेतकऱ्याने खाली उडी घेतली. कमरेच्या धडप्यात बांधलेली नाचणीची भाकर आणि मिरच्यांचे लाल तिखट बाजींच्या तळहातावर ठेवले. 'नको' असा हात करत बाजीप्रभू हळूच बोलले,''तू उपाशी राहशील की रे बाबा!''

''आमची नगं काळजी करू देवा.अरं किती लढतोयस तू दिवसभर

आपल्या शिवाजीराजांसाठी. गप घे खाऊन, तुला आमच्या खंडोबारायाची आण. घे रे दादा एक घास.''

बाजीप्रभूंनी त्या नाचणीच्या भाकरीचे उभ्याउभ्याच कसेबसे दोन-तीन घास आपल्या दाढेखाली घातले. तोच त्यांना आपल्या फुलाजीची आणि शंभुजी जाधवांसारख्या तरण्या लढवय्या पोरांची सय झाली. तशी त्यांनी उरलेली अर्धी भाकरी आपल्या बंडीच्या खिशात शिलकीत ठेवून दिली. आश्चर्यचकित होऊन बाजी अल्याडपल्याड पाहू लागले. आजूबाजूच्या गावातले काही शेतकरी, आयामाया तिथे धावल्या होत्या. वेळूच्या बुट्टीत त्यांनी मिळतील तेवढ्या भाकरी, शिंकाळ्यावरचा दहीकांदा, कुठे रानभाजी जे हाती गवसले ते घाईने तिथे आणले होते. प्रत्येक मावळ्याच्या वाट्याला एखाददुसराच घास आला असेल; परंतु त्यासोबत भरपेट पाणी प्याल्याने त्यांच्या अंगामध्ये पुन्हा उभारी संचारली. ते तत्काळ जंगासाठी खडे झाले.

तेवढ्यात खिंडीच्या खालच्या अंगाने ''दीन दीन, चलो मारो ऽऽ'' अशा वैऱ्याच्या हाकाट्या ऐकू आल्या. तशा मराठा वीरांनी पुन्हा तलवारी उपसल्या. झुंजाला सुरुवात झाली; परंतु खिंडीच्या खालून येणारा आवाज आता खूप वाढला होता. त्या बाजूचा कानोसा घेत रायाजी बांदल धावत आला. बाजीप्रभूंजवळ येत धापा टाकत सांगू लागला, ''बाजीदा, बऱ्यापैकी घोटाळा झाल्यासारखं दिसतं रे!''

''काय रे, काय झालं रायाजी?''

''पल्याड दुश्मनाला ताजी कुमक आलीय. तो अफझुल्याचा पोरगा फाजलखान नव्या दमाचे तीन-चार हजार सैनिक घेऊन त्यांच्या मदतीला धावून आलाय.''

''बरं मग?''

''त्यांनी मघाची आपली दमलेली फौज मागं घेतलीय. आता ताज्या ईर्ष्येची आदिलशाही पोरं आघाडीवर आलीत. अक्षी चवताळल्यासारखी करताहेत!''


''जाऊ दे रे रायाजी. कोण घाबरतो त्यांना? दुप्पट मेहनतीनं एकेकाला कापून काढू. एकदा फक्त गडावरनं तोफेचा आवाज आला, अन् मग यमाचा रेडा दिसला तरी बेहत्तर!''

दुपार कलून गेली होती. तिकडे बाजीराजे घोरपड्याने डाव साधला होता. त्याने दाखवलेल्या मार्गाने, त्याच्या वाटाड्यांसोबतच सिद्दी जोहरने ती चार

## नवी संहिता ... नवा आशय...

# राफिणू

**डॉ. संजय ढोले**




राजू फिरकेने आपल्या गावाच्या
कोरोनामुक्तीसाठी केलेल्या वैज्ञानिक
प्रयत्नांची यशोगाथा...
कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील विज्ञान कादंबरी

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# क्युअर्ड

**डॉ. जेफ्री रेडिगर**

अनुवाद

**सुप्रिया वकील**




शारीर आजारावर मानसिक आजाराच्या
दिलासादायक मात्रेचा मूलमंत्र देणारं
अफलातून पुस्तक

**किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

हजाराची ताजी कुमक धाडली होती. आता रणातला जंग कमालीचा विषम बनत चालला होता. खवळलेला गनिम वेगाने पुढे सरकत होता. आसमंतात सायंकाळचा वारा वाहू लागला होता. भोवताली घनदाट जंगल असल्याने सायंकाळच्या सावल्या खूप आधी त्या अरण्यात उतरू लागल्या होत्या. एका-पाठोपाठ एक मावळा लढतालढता खर्ची पडू लागला होता.

रायाजीने दुश्मनाच्या मदतीला पोचलेल्या ताज्या फौजेची खबर आणली, तेव्हाच त्या बातमीने नखशिखान्त पेटून गेलेले शंभुजी आणि फुलाजी बेडरपणे पल्याड खिंडीच्या तोंडाकडे धावून गेले होते. त्या अर्धवट वाकड्या वळणाच्या पल्याडच्या भागात काही वेळापूर्वी जबरदस्त हंगामा उडाला असावा; कारण त्या बाजूने कानठळ्या बसवणाऱ्या ''हर हर महादेव''च्या आरोळ्या आणि ''दीन दीन''च्या प्रतिहाका कानावर पडल्या होत्या. आता बाजीप्रभूही लढतालढता त्याच दिशेने पुढे सरकू लागले होते.

त्या बाजूकडे तलवार सपासप चालवत बाजीप्रभू सरकले, तेव्हा तिकडे किमान साठ-सत्तर मराठ्यांचे गतप्राण देह त्यांना दिसले. त्याच बाजूस आदिलशाहीतल्या ताज्या पथकातला जाडजूड अंगाचा एक खान तिथे उकिडवा होऊन खाली कोसळल्याचे दिसत होते. त्याच्या पोटावरचा झगा फाटून कोथळा उघडा पडला होता. पोटात घुसलेल्या तलवारीकडे बाजींचे लक्ष गेले. गलेलठ्ठ मांसातून घुसून बरगडी पार करून गेलेले ते तलवारीचे पाते मध्येच खानाच्या देहात अडकले होते. ते दृश्यच मोठे बीभत्स होते.

तेवढ्यात बाजींची नजर त्या तलवारीच्या मुठीकडे वळली. सोन्याचे पाणी दिलेली मत्स्याच्या आकाराची ती मूठ! तिच्याकडे नजर टाकताच बाजीप्रभूंच्या काळजात धस्स झाले. गेल्याच महिन्यात आपल्या खासगी शस्त्रागारातल्या अशा सुबक सुवर्ण मुठीच्या दोन तलवारी शिवरायांनी त्या दोघांना भेटीदाखल दिल्या होत्या. पैकी एक हत्यार फुलाजीला मिळाले होते अन् दुसरे शंभुजीला. काळीज चरकले होते. वेळ ऐन जंगाची, त्यामुळे बाजीप्रभूंना त्या सुवर्णमुठीजवळ थांबायला वेळही नव्हता; मात्र खानाच्या कोथळ्यात अडकलेले शस्त्र त्या दोघांपैकी कोणातरी एका बहाद्दराचे नक्कीच होते.

समोर बाजीप्रभूंना बघून समोरून दुश्मन मोठ्या गर्दीने धावून आला. तेवढ्यात बाजींचा पाय खाली कोसळलेल्या एका मर्दाला थडकला. त्यांनी खाली नजर टाकली, तेव्हा त्यांच्या पायाशी बेहोशीत कोसळलेला शंभुजी

जाधव त्यांना दिसला. खुद्द राजांचे मित्र, मेहुणे आणि काशीबाई राणीसाहेबांचे बंधू. त्यांच्या तडफडत्या देहाजवळ बाजीदा खाली वाकले. तोवर मरणासन्न झालेल्या शंभुजींनी पलीकडे बोट दाखवले, तशी बाजींची नजर उजवीकडे गेली. तिथेच ओढ्यात ओल्या पसरट खडकावर त्यांना एक जिवंत देह तडफडताना दिसला. त्याचे जखमांनी लडबडलेले शरीर, छाती आणि दंडाच्या बाजूने भाल्याची पाती घुसल्याच्या खोल जखमा. त्यातून उन्मळून वर येणारे रक्ताचे बुडबुडे. अंगाखालून वाहणाऱ्या ओढ्याच्या पाण्यात त्या मर्दाचे रक्त मिसळत होते. खूपच रक्त वाहून गेले होते.

तापल्या वाळूवर तडफडणाऱ्या माशासारखे फुलाजीचे ते थरथरणारे अंग. त्या बहोशीत एखाद्या निरागस मुलासारखा तो निळ्या आभाळाकडे पाहत होता. भयंकर वेदनांनी त्याचा व्याकुळलेला तो देह पाहून बाजी गडबडले, तसेच पुढे धावले. इतक्यात समोरून साठ-सत्तर आदिलशाही तलवारी ''दीन दीन, अल्ला हो अकबर'' अशा आरोळ्या ठोकत त्यांच्या दिशेने धावून आल्या. ते जंगेमैदान आता असे पेटले होते की, जगले कोण आणि मेले कोण याची वास्तपुस्त करायलाही वखतच उरला नव्हता. सारे मायापाश विसरून बाजीदांना कमरेची तलवार उगारत पुढे मुसंडी मारावी लागली.

क्षणाची ढिलाईही महागात पडणार होती. सभोवती गनिमांचा गराडा पडू पाहत होता. तेवढ्यात बाजीप्रभूंच्या शागीर्द पोऱ्याने त्यांच्या हाती पुन्हा दांडपट्टा दिला. आपल्या दोन्ही भक्कम हातात दांडपट्ट्याची लांबच लांब पाती घेऊन बाजीप्रभू उभे ठाकले. ती पाती दोन्ही हातांतल्या गोफणगुंड्यांसारखी गरगर फिरू लागली. बाजींना नेस्तनाबूत करण्यासाठी दुश्मनांच्या तुकड्या अंगावर येऊन कोसळत होत्या; मात्र खळीस आलेल्या सिंहासारखे बाजी रणमैदानाचाच घाम काढत होते. त्यांच्या आजूबाजूने मुंडक्यांचा, मुडद्यांचा खच पडत चालला होता.

घोडखिंडीच्या घळईतली ती झुंज अखंड पाच तास सुरू होती. शस्त्रास्त्रांच्या घावांनी, मर्दांच्या आरोळ्यांनी आणि घोड्यांच्या खिंकाळ्यांनी सारे रणांगण थरारून गेले होते.

बाजीप्रभूंचा देह आता रक्तानेच अंघोळ केल्यासारखा लालभडक दिसू लागला होता. पावसात वस्त्रे भिजावीत, तशी त्यांच्या अंगातली बाराबंदी आणि नेसूची तुमान दोन्ही रक्ताने माखून गेले होते.

सगळ्यालाच आता खूपच उशीर झाला होता. त्यांना मरणाची फिकीर अशी नव्हतीच; मात्र त्या लढवय्या मर्दाचे कान दूर कुठेतरी लागले होते. तोवर जवळपास तीनशे आदिलशाही लढवय्यांनी बाजीप्रभूंच्या सभोवती गराडा घातला होता. चिखलातल्या रक्तात आणि रक्तातल्या चिखलात तो जंग पेटला होता. करडाच्या वाळक्या पेंढीसारखे बाजींचे शरीर मात्र पेटतच राहिले होते. काळजाची हुरहुर वाढत होती. इंतजार संपत नव्हता. हातातली दांडपट्ट्याची पाती मोडून पडली होती. पाठीवरची ढाल त्यांनी छातीवर धरली; परंतु तीही गनिमांकडून झालेल्या घावांच्या तडाख्यांनी फुटून गेली होती.

आता एका हातात धारदार खुरासनी तलवार आणि ढाल फुटलेल्या हातावर गुंडाळलेले डोईचे पागोटे, अशा स्थितीत पुराणातल्या एखाद्या देवतेसारखा भासणारा तो मर्द अखंड झुंजतच होता. त्यांचे पाठ, पोट, तोंड, एवढेच नव्हे तर मस्तकावरची शेंडीसुद्धा रक्ताने माखून गेली होती.

तेवढ्यात खूप दुरून कसलातरी कडाडता आवाज आला. तसे आनंदाने पागल झालेल्या त्या जीवाने मुखावरचे रक्त पुसले. पलीकडे कान दिला. कानामध्ये दूर गडावरून आलेले कडाडत्या तोफांचे आवाज घुसले. तसे बाजीप्रभू खुशीने, ''राजे ऽ राजे ऽऽ'' असे मोठ्याने गरजले. तोवर अगदी समोरून सिद्दी मसूदच्या खाशा पथकाकडून एक जंबुरक्याचा गोळा आला, ज्याच्या दणक्याने त्या मर्दाचे शिर उडाले. अन् पुरातन महावृक्षासारखा त्यांचा देह घोडखिंडीतच खाली कोसळला. पावन झाला.

## तोफांची सलामी, काळजाची चाळण!

सकाळी अकराच्या दरम्यान राजांनी गजापूर ओलांडले होते. त्यांच्या घोड्याच्या अंगाला अंग लावून सिद्दी हिलालांचा घोडा दौडत होता. पावसाच्या झडी सुरूच होत्या. दूरवरून विशाळगडाचे भव्य कडे दिसू लागले. त्या दिशेने पावसाळी ढगांच्या पखाली आभाळातून जोराजोसाने वाहत येताना पुढे दिसत होत्या.

मुख्य विशाळगड आणि त्याच्या डाव्या बाजूला खाली उतरत गेलेला वरातकडा. त्यांच्या माथ्यावरून येणाऱ्या ढगांच्या काळ्या करवंदी पुंजक्यांत गड मध्येच एकाकी बुडून जायचा. पुन्हा ढगांच्या पोटात वारा घुसला की त्यांच्या राशी पांगायच्या. त्या तांबूसकाळ्या-निळ्या पापुद्र्यांतून तो भव्य खेळणा तथा विशाळगड पुन्हा लख्ख उठून दिसू लागायचा.

गड जवळ येताच राजांच्या सोबत असणाऱ्या मावळ्यांनी ''हर हर महादेव ऽऽ'' ''शिवाजी महाराज की जय'' असा मोठमोठ्याने जयघोष करायला सुरुवात केली. समोरची टेकडी पार करत एक वळसा घेतला. तर पुढच्याच अंगाने ''दीन दीन ऽऽ'' ''अरे धरा! रोखा ऽऽ'' अशा हाकाट्या ऐकू येऊ लागल्या. राजांची वाट रोखण्यासाठी उभ्या ठाकलेल्या त्या पथकांचा चेहरा गोंधळात पाडणारा होता; कारण त्यामध्ये काही इस्लामी सैनिक आणि बऱ्याचशा कोकणी मुलखातल्या शिपाईगड्यांचा मोठा भरणा दिसून येत होता.

राजांनी घोड्याचा लगाम खेचला, तोवर बाजूच्या काही गावकऱ्यांशी आणि गडावरून मुसाफिरीवर निघालेल्या काही अंमलदारांशी राजांची गाठ पडली. तसे शिवरायांनी दरडावणीच्या सुरात विचारले, ''कोणाची दिसतात ती समोरची पथकं?''

''कोकणचे राजे जशवंतराव दळवी पालाणकर आणि श्रृंगारपूरचा सूर्यराव सुर्वे वाटेत खडे आहेत महाराज आपल्या!''

त्या दोघा मराठ्यांची नावे कानावर पडताच राजे कसनुसे हसले. त्यांच्या सरदार शिपायांनी राजांकडे बघितले. तेव्हा राजे कडाडले, ''हे कशाचं सैन्य? ती भाडोत्री बुजगावण्यांचीच बाजारगर्दी दिसते. ती तोडून आणि सोलून काढायला असा कितीसा वेळ लागतो—?''

''चला ऽऽ हर हर महादेव ऽऽ'' पाठीमागून पुकार झाला.

राजांच्या सोबतचे तीनशे वीर समोरच्या आडव्या आलेल्या फौजेवर आदळले. वैऱ्यांच्या पथकाच्या मागे बऱ्यापैकी उताराची जमीन दिसत होती. ह्या मुलखात दोन महिने सततचा प्रचंड पाऊस पडत होता. अगदी न थांबता सतत कोसळणाऱ्या त्या धारा. प्रत्यक्ष लढाईस तोंड फुटताच सुर्व्यांची आणि दळवींची घोडी तिथे तग काढेनात. त्या लाल बुरमाच्या मातीच्या निसरड्या झालेल्या चिखलावरून जनावरे पाय घसरून तोंडावर आपटू लागली. समोरून हल्ला आला की घोड्यांचे खूर त्या बरबटत्या चिखलात सटपटू लागले. ती घोडी आडवीतिडवी होऊन बाजूला पडत होती.

सुर्व्यांचा आणि दळवींचा स्वत:चा आणि त्यांच्या जनावरांचाही बाज आणि ऐट जहागिरदारी, ऐशोआरामी थाटाची होती. राजांच्या घोड्या-माणसांनी पन्नासभर दऱ्याखोऱ्यांचे पाणी जोखले होते. त्यांना आगीधगीतल्या आणि चिखलगाळातल्या खडतर प्रवासाची नेहमीची सवय होती. त्यापुढे मालकांप्रमाणेच सुर्वे आणि दळवींची जनावरेही गुलहौशी. चंदी चघळत पागेत लाडात जन्म काढणारी. तीच जनावरे आज शिवरायांच्या तडाख्यापुढे टिकेनात.

तेवढ्यात किल्ल्याच्या पायथ्याला लागूनच असलेल्या दरीतून धडाडधूम कडाडधूम असे स्फोटांचे विलक्षण ध्वनी कानावर आदळले. शिवरायांच्या घोंगावत्या हल्ल्यापुढे आपली धडगत नाही, हे सुर्वे आणि दळवींनी लगेचच ओळखले होते. नव्हे त्यांच्या अंगाखालच्या घोड्यांनीसुद्धा रणमैदान सोडून बाहेर पळायला सुरुवात केली. बांडगुळे झाडावर वाढतात; पण त्यांच्या मुळ्या मात्र आडव्यातिडव्या पसरतात. तसाच खोटेपणा सुर्वे आणि दळवींनी दाखवून दिला होता.

समोरचा विशाळगडाचा कडा आणि त्याच्याच पुढ्यातला अलीकडच्या डोंगराचा सपाटीचा भाग, या दोन्हींच्या बेचक्यात एक हजारभर फूट घळई होती. चार-पाच हात रुंदीची. तिच्यावरच्या लाकडाने आणि बांबूने बांधलेल्या पुलावरूनच माणसे-जनावरे समोरच्या विशाळगडाचा चढ चढून जात. त्याच घळईमधून एवढ्या पावसातही धुराधगींचे लोट वर येताना दिसू लागले. शिवाजीराजांना अडवता येत नाही तर त्यांना थेट वर गडावर पोचू द्यायचे नाही, त्यांच्या मार्गात मुद्दाम जळते बिब्बे पेटवावेत, अशा दुष्ट हिशोबानेच त्यांनी डाव साधला होता. समोरच्या घळईतील त्या लाकडी पुलाच्या तळावर स्फोटके बांधून त्यांनी तो पूल उडवून दिला होता.

आपला कमकुवत, भित्रा दुश्मन बाजूच्या ओल्या हिरवाईत पळून गेल्याचे राजांनी बघितले; मात्र त्याचवेळी त्यांच्या धावत्या निर्धारी पावलांच्या आड संकट उभे राहिले होते. मधला कोसळलेला पूल अल्प काळात आणि तेही भरपावसात नव्याने बांधणेही शक्य नव्हते. त्यामुळे त्या खतरनाक घळईत उतरून ती पार करत पुढे धावण्याशिवाय इलाजही नव्हता. घळईचा उतार अगदीच तीव्र होता. एखाद्या विहिरीत उतरल्यासारखा. त्यामुळे राजांसह सर्वांनी घोड्यांच्या पाठाणांवरून पटपट खाली उड्या ठोकल्या. घोड्यांचे लगाम घट्ट मुठीत पकडून मार्गातल्या शेवाळून गेलेल्या दगडांच्या ओल्या मस्तकांवरून ते सारे घळईत उतरले. जेवढा उतार होता, तेवढाच पुन्हा दमछाक करणारा चढ पुढे खडा होता. त्यामुळेच राजांचा ऐन वेळी आणखी दोन तासांचा वेळ अकारण वाया गेला होता.

एकदाचे राजे गड चढून वर गेले. किल्लेदार, सबनीस आणि गडावरचे अन्य अंमलदार राजांच्या स्वागताला समोर धावून आले. राजांची पावले अखेर विशाळगडावर पोचली असली, तरी त्यांचे भिरभिरते मन कुठे जाग्यावर होते? ते तर खाली घोडखिंडीकडच्या दऱ्याखोऱ्यांभोवती घुटमळत होते. त्यांना लगेच जाणीव झाली. त्या खिंडीत दुश्मनांचा गळा घोटताना आणि रणांगणावरच्या वैऱ्यांशी टक्कर घेताना या क्षणी त्या सर्वांचे कान आपणाकडेच लागले असतील. राजांचे मन घोडखिंडीकडेच रुंजी घालत होते. आपले बाजी, फुलाजी, रायाजी आणि शंभुजी कसे असतील? तिकडून इथे गडाकडे कधी येऊन पोचतील? राजांचे डोळे त्या वाटेकडेच होते.

राजांनी तातडीने तोफखान्याच्या अंमलदाराला तोफेला बत्ती द्यायचा हुकूम दिला. त्या हुकुमानुसार तिथल्या प्रचंड तोफेने एकापाठोपाठ एक अशा पाच डरकाळ्या फोडल्या, ज्यामुळे आजूबाजूच्या कड्यांवर ते तोफध्वनी आदळून त्यांच्या प्रतिध्वनींचे कंप आसमंतात सर्वांच्या कानावर आदळले.

राजे गडावर किल्लेदाराच्या वाड्यात उतरले होते. स्नान उरकून त्यांनी लगेच दोन घास पोटात घालावेत अशी सिद्दी हिलालांनी आणि बाकीच्या अंमलदारांनी विनवणी केली. सलग सतरा तासांची काटेकुटे, जंगल तुडवीत केलेली वाटचाल आणि नंतर अडीच तासांची घोडदौड. त्या प्रवासाने राजांची सारी गात्रे आता शिणून गेली होती.

स्नान उरकून राजे तसेच नेसूच्या पंच्यावर देवघरात गेले. किल्ल्यावरच्या

देवघरातच राजांच्या प्रवासी देव्हाऱ्यावरच्या मोजक्या मूर्ती रेशमी वस्त्रावर ठेवल्या गेल्या होत्या. राजे तिथे नतमस्तक झाले. तेवढ्यात कारभाऱ्याने राजांच्या भोजनासाठी गरमगरम थाळा आणला. ह्या कोकणपट्ट्यात राजे आले की, नाचणीची भाकर, मिरच्यांचा खर्डा आणि पिठले आणि वर तोंडी लावायला भुईमुगाचे भाजलेले दाणे हे राजांचे आवडते अन्न असायचे. त्याची आजही सिद्धता झाली होती; मात्र विलक्षण मानसिक तणावाखाली वावरणाऱ्या राजांनी आपल्या त्या आवडत्या थाळ्याकडे ढुंकूनही पाहिले नाही.

मिटल्या डोळ्यांनी राजे बराच वेळ देव्हाऱ्यापुढे नतमस्तक होऊन बसून राहिले. काही वेळाने त्यांनी पाठीमागे नजर टाकली.

सिद्दी हिलाल पलीकडच्या मलिक उलतुजारच्या दर्ग्यात जाऊन आले होते. तिकडेच त्यांनी सायंकाळचा नमाज पढ़ला होता. एकतर सिद्दी हिलाल शहाजीराजांचे समवयस्क. जुने अनुभवी हाड. राजांची मनधरणी करण्यासाठी बाकीच्या अंमलदारांनी त्यांनाच पुढे केले. तसे सिद्दी हिलाल भोजनाचा थाळा घेऊन राजांजवळ गेले आणि म्हणाले, ‘‘राजाजी, आखिर कोई भी हो—रुस्तुम या इस्फिंदार, अगर आपके राम और किशन भगवान—खुदा भी जब आदमीके रूपमें जनम लेता है, तो उन्हे भी तो खाना खानाही पडता है—’’

‘‘सिद्दी साहेब, आपण कल्पनाही करू शकणार नाही. मनुष्य इकडे आणि श्वास तिकडे—तसे माझे बहाद्दूर नरवीर—फुलाजी, बाजी, शंभूजी, रायाजीसारखे वीर अजून इथवर कुठे येऊन पोचलेत?’’

‘‘पण महाराज— ?’’

‘‘तुम्हास काय कल्पना? रणाच्या चरकात आपली जिवाभावाची माणसं अडकली की इकडं प्राण कंठाशी कसे येतात?’’

‘‘माझा सिर्फ अठ्ठावीस वर्षांचा बच्चा वाहवाह—मेरी आँखोके सामने दुश्मन ले गया ऽ और हम खाली देखते रहे—हम सब आपके पाक मकसद के वास्ते, सब मुसीबतोंकी वादियाँ चलते आये हैं हुजूर—’’

सिद्दी हिलाल धाडसाने दुधाचा प्याला घेऊन राजांकडे गेले. एका हुतात्म्याच्या जन्मदात्याचा तो आग्रह नाकारणे त्यांना शक्य नव्हते. त्यांनी प्याला ओठाशी लावून एकच घोट प्राशन करताना आपले डोळे मिटले. ते अमृत त्यांच्या पोटात उतरले, तोच त्यांची नजर पाठीमागे वळली.

चार बांदलांची पोरे, दोन हरकारे, सारे असे थिजून गेल्यासारखे समोर

मूकपणे उभे होते. कोसळत्या चिखलपाण्यामुळे, त्या भागातील तांबूस रापल्या मातीमुळे त्यांच्या अंगावरची वस्त्रे तांबूस रंगाने बरबटल्यासारखी भासत होती. त्या सहाही जणांचे तांबूस डोळे राजांकडे एकटक बघत होते. त्यांच्या नेत्रांना फुटलेला पाझर—त्यांची ती अवस्था पाहून राजांचे हृदय चरकले.

राजे पुढे धावले. त्यांनी सूर्याजी बांदलाला आवेगाने मिठी मारत विचारले, ''सांग पोराऽ कोण कोण खर्ची पडलं?''

''दुपार कलून गेल्यावर शंभुदादा जाधवराव आणि फुलाजी, संध्याकाळी इकडं तोफेचा कडाडता आवाज कानावर पडला आन् तिकडं बाजीदांच्या शिराचं श्रीफळ स्वराज्याच्या पायरीवर घरंगळून पडलं. मोठाच रक्तपात घडला. शंभरभर बांदल कुटून मृत्युमुखी पडला—''

राजे तसेच देवासमोर वीरासनात बसून राहिले. त्या अवस्थेतून त्यांना उठवायची कोणाची हिम्मत झाली नाही. त्यांनी आपल्या बहाद्दूर हुताम्यांच्या मृतदेहांची चौकशी केली, तेव्हा त्यांना दोन गोष्टी त्यातल्या त्यात समाधानकारक ऐकायला मिळाल्या. रायाजी बांदल जिवंत होता. तो पंचक्रोशीतील गावकऱ्यांसोबत घोडखिंडीतल्या त्या महावीरांची शवे घेऊन काही वेळात इकडे गडावर पोचणार होता.

राज्यरथाचे चक्र सतत सुरूच ठेवावे लागते. त्याला कोणाच्या जगण्या-मरण्याचे सोयरसुतक असत नाही. राजांनी बाकीची उरली कामे नेटाने उरकायला सुरुवात केली. सिद्दी मसूद आणि त्याच्यापाठोपाठ ससैन्य धावत आलेला फाजलखान. घोडखिंडीच्या परिसरात जेव्हा रण मोडले होते, तेव्हा झाडाझाडांतून खाली उतरलेल्या काळ्या सावल्या साऱ्यांच्या तनामनाला भिववीत होत्या. जीत होऊनही सिद्दी मसूदला आणि फाजलखानाला फतेहची कसलीही मिळकत लुटता आली नाही. याउलट सह्याद्रीच्या त्या भयानक, काळोख्या आणि एकाकी रानातून जीव बचावत पाठीमागे पळणे विजापुरी फौजेला हिताचे वाटले. त्यामुळेच ते सारे मागे फिरले. ते झपाट्याने पाठीमागची मलकापूरकडची खिंड उतरले. पुढे कासारी नदीच्या काठावर काही काळासाठी ते थांबले.

तरीही शिवराय अखंड दक्ष होते. त्यांनी विशाळगडाच्या लष्करी मजबुतीसाठी पावले उचलली. अनेक ठिकाणची पथके विशाळगडाकडे वळविण्याच्या सूचना केल्या.

दुसऱ्या दिवशी पाऊस पूर्णत: थांबला होता. गडाखालच्या समोरच्या झाडीतून तीनचारशे गावकऱ्यांचा लोंढा येताना दिसला. पांढऱ्या पाण्याच्या पुढे घोडखिंडीत शिवरायांच्या बहाद्दूर सरदारांना वीरमरण मिळाल्याची खबर आजूबाजूच्या दहा गावांत झाली होती. त्यामुळे गावकरी झोपले नव्हते. त्यांनी आपापल्या गावच्या ग्रामदेवालयात जत्रेसाठी बांधून ठेवलेल्या पालख्या खाली उतरवल्या. देवांच्या त्या मोकळ्या पालख्या घेऊन ते भाबडे गावकरी घोडखिंडीत धावले. त्यांनी बाजी, फुलाजी, शंभुजी यांचे मृतदेह सन्मानाने पालखीत ठेवले अन् चिखलपाण्यातून मध्यरात्रीनंतर त्यांनी वेगाने समोरची वाट चालायला सुरुवात केली. उजाडता-उजाडता गडाच्या पायथ्याखाली त्या पालख्या पोचल्या. बाजी, शंभूजी आणि फुलाजींचे मृतदेह पळसाच्या हिरव्या पानांखाली झाकले गेले होते. त्या कलेवरांना हळद फासली गेली होती. तपस्वी साधूसंन्याशांच्या मुखासारख्याच त्यांच्या त्या चिरनिद्रा. आपल्या त्या मुख्य सरदारांची ती स्फूर्तिदायी शिरकमले बघताना धीरगंभीर मनाच्या राजांच्या मनाचा बांध फुटला.

त्या दुपारी आपल्या जिवलग सोबत्यांसह राजे बाजूच्या पाताळदरीत उतरले. रायाजी बांदलासह ते सारे ओल्या गवतावरून झपझप पावले टाकत पुढे निघाले होते. कालचा मुसळधार पाऊस आज कुठेतरी परागंदा झाला होता.

दुपार होऊनही सूर्याने ढगाबाहेर तोंड काढले नव्हते. रुसलेला हलका वारा मध्येच एखादी झुळूक घेऊन येत होता. कमरेपर्यंत वाढलेले हिरवे गवत नाराजीने माना टाकत होते. भर पावसाळ्यात विशाळगडाच्या त्या मुलखात वाहणाऱ्या असंख्य ओढ्यानाल्यांचे ध्वनी कानावर पडत होते. जसेकाही ते ओढेनालेही आपले अश्रू रोखायचा प्रयत्न करत होते. जेव्हा सरणावर शंभुजी, बाजी आणि फुलाजींचे मृतदेह ठेवले गेले, तेव्हा राजांनी आपल्या खांद्यावरची शाल त्या तिघांच्या कायेवर फुलांच्या चादरीसारखी अलगद पसरून ठेवली. आतापर्यंत शिवरायांनी आपल्या मनात महत्प्रयासाने रोखून धरलेला बांध फुटला. आपल्या त्या बहाद्दूर साथीदारांना अखेरचा निरोप देताना उन्मळून गेलेला तो सह्याद्रीचा राजा एखाद्या लहान मुलासारखा हुंदके देत रडू लागला.

त्या वीरांच्या देहांना मंत्राग्नी दिला गेला आणि लगेचच त्या हुतात्म्यांच्या स्मृतीदाखल त्या पवित्र जागेवर तुळशी वृंदावनाचे बांधकाम हाती घेण्याची किल्लेदारास राजाज्ञा झाली.

दोन-तीन दिवसांतच पन्हाळा-विशाळगड भागातील पुढची तातडीची कामे आणि जबाबदाऱ्या राजांनी उरकल्या. मलकापूर-अमेनीच्या पहाडी रस्त्याने आणि पुढे वारणा नदी पार करून लाडोबाच्या डोंगरावरून राजांनी अजिंक्यताऱ्याकडे जाणारी जंगलवाट पकडली. त्यांना तीन दिवसांच्या आत राजगड गाठायचा होता.

आपल्या राजधानीत पोचण्यापूर्वी वाटेतल्या बाजीप्रभूंच्या 'सिंध' नावाच्या गावाला भेट देण्याचा राजांचा मनसुबा पक्का होता; मात्र जसजसा तिकडचा रस्ता सुरू झाला, तसे राजे कमालीचे भावनाविवश झाले. त्यांच्यासोबत रायाजी बांदलांचा घोडा चालला होता.

काही महिन्यांपूर्वीच देहू-आळंदीकडची कामगिरी बजावून येताना बाजींनी राजगडास दिलेली ती भेट. तेव्हा बाजींच्या धर्मपत्नी सोनाबाई आणि गौतमाबाईंचे जिजाऊसाहेबांनी अप्रूपाने केलेले ते आगतस्वागत. त्या आठवणी सांगताना बाजी किती भावुक झाले होते. भावनेच्या त्या ओघातच त्यांनी राजांकडून एक वचन घेतले होते, ''राजे ऽ एक प्रार्थना आहे आपल्या चरणांशी. कृपया आपण नाही म्हणू नये. आमच्या मातोश्रींना, बयोबाईंना भेट द्यावी. आमच्या सिंध गावास यावं.''

''येईन की बाजीदा—जरूर येईन!'' राजांनी बाजींना अगदी तोंडभरून वचन दिले होते.

''राजे, आमच्या आई बयोबाई तुम्हा सर्वांची सारखी सय काढतात. पेमगडावर डोळ्यांसमोर खेळलेला शिवबा नावाचा चिमुकला चांदवा आता एवढा आभाळागत बडा झालाय म्हणून म्हणतात, मरणापूर्वी बघू दे रे लेकराला!''

शिवरायांची घोडी जशी त्या खोऱ्यात पोचली, तसे त्यांना आपल्या अंगामध्ये कापरे भरल्यासारखे वाटले. ते येसाजीला बोलले, ''गड्या ऽ जळत्या धुमसत्या रणांगणात घोड्यासकट छलांग घ्यायला कसलीही भीती वाटत नाही रे! पण बाजीप्रभू आणि फुलाजीप्रभूंच्या माघारी त्यांच्या आईपुढं कसं उभं राहायचं?— तेही त्यांच्या लाडक्या लेकरांशिवाय? काळीज धडधडतंय रे.''

सिंध गावच्या शिवेवरच्या चिंचेच्या बनामध्ये राजे घोड्यावरून पायउतार

झाले.

स्वराज्यासाठी आहुती देणाऱ्या बाजी, फुलाजी, शंभुजी, शिवा काशिद, सिद्दी वाहवाह, अशा सहस्र वीरांच्या आठवाने सिंध गावची ती सारी पंचक्रोशी भावविवश बनली होती. राजे पालख्या मागे ठेवून अनवाणी पायाने गावातून पुढे चालले होते. सारा गाव राजांच्या सोबत निघाला होता. सोबतची घोडीही उदासवाणी दिसत होती, मोकळ्या पाठीने चालली होती. माणसे, जनावरे, चिंचेची इवलीइवली हिरमुसली पाने, अवघा परिसर जणू सुतकात होता.

पिलाजीपंतांचा जुना वाडा एकदाचा लागला. त्यांच्या नातवांनी, बाजी-फुलाजींनी घराण्याच्या इभ्रतीवर सोन्याचा कळस चढविला होता. आरंभी बालिंग्याजवळ बाजी-फुलाजींचे उर्वरित दोन बंधू वेल्होजी आणि अण्णाजी सामोरे आले. त्यांची ओळख होताच राजांनी त्या दोन्ही बंधूंना आपल्या दोन्ही बाहूंजवळ एकत्र पकडले. सर्वांच्या डोळ्यांतून आसवांचा पाऊस वाहत होता.

तेवढ्यात अंगणातल्या चौकातून गौतमाबाई आणि सोनाबाई ह्या बाजीप्रभूंच्या दोन्ही धर्मपत्नी आवेगाने बाहेर आल्या. त्यांनी जोराचे हुंदके फोडत राजांकडे बघितले. त्या म्हणाल्या, "आपण एकटेच आलात महाराज? आमचे 'हे' कुठं आहेत?"

पाठोपाठ एका हाताने काठी टेकत इतर स्त्रियांच्या आधाराने बाजींच्या मातोश्री बयोबाई बाहेर आल्या. त्या ऐंशीच्या घरात होत्या. पिकल्या पिंपळपानापेक्षा जीर्णशा दिसणाऱ्या; पण डोळे सजग. किलकिले. शरीर दुबळे. खूप थकलेले. शोक व्यक्त करावा तर श्वास अडकत होता. हुंदका फुटत नव्हता.

बुजुर्ग बयोबाईंनी अंगणात अंथरलेल्या घोंगडीवर आपल्या शेजारी शिवरायांना बसवून घेतले. आता उभ्या गावाचे कान आणि डोळे राजांकडे लागले होते. तेवढ्यात हिम्मतबाज सोनाबाई उठल्या. त्वेषाने म्हणाल्या, "महाराज, आमचं कुंकू पुसणाऱ्या वैऱ्याला कळवा, अजून ह्या प्रभूंच्या वाड्यातली धारदार हत्यारं बोथट झालेली नाहीत म्हणून. राजांची सोबत करायला अजून आमचे अष्टपुत्र आहेत म्हणावं वैऱ्याला!"

शिवरायांनी त्या आठही तरुणांचा सन्मान केला. त्यांच्या कमरेला ते स्वत: मानाचे शेले बांधू लागले. त्या कृतीने सर्व जण अतिशय प्रेरित झाले.

राजांनी त्याच बैठकीत बाजींचे पुत्र बाबाजी यांना आपल्या स्वराज्यात सरदारकी बहाल करीत असल्याचे घोषित केले. बाजींच्या बाकीच्या साती

पुत्रांनाही राज्यसेवेत घेतले. त्या सर्वांना पालखीचा मान जाहीर केला. प्रभू जातीच्या अनेक वीरांना स्वराज्य कारभारात त्यांच्या वकुबाप्रमाणे दाखल करून घेतले. जे अधिक पात्र होते, त्यांना किल्ल्यांची सबनिशी देऊ केली. घोडखिंडीत अनेक बांदलांनी पराक्रम केला होता. त्यांच्या गौरवार्थ राजांनी दिपाऊ बांदल या मातेचाही मोठा आदरपूर्वक सन्मान केला. त्याचवेळी शिवरायांनी रायाजीच्या साक्षीने अनेक बांदलपुत्रांचा आणि मातांचा यथोचित सन्मान केला.

बाजी आणि फुलाजींच्या कैक स्फूर्तिदायी आठवणी राजांनी सिंध गावाला ऐकवल्या. मध्येच त्यांचा आवाज घोगरा व्हायचा. आधीच गौरवर्ण असलेल्या शिवरायांच्या नासिकेचा शेंडा आज दु:खाने अगदी लालेलाल दिसत होता. ''आपले ग्रामपुत्र बाजी आणि फुलाजी बंधू पौर्णिमेच्याच दिवशी स्वराज्यासाठी कामी आले. त्यांच्यासारखे तारेच आभाळाच्या मंडपात जाऊन स्थिर होतात. दु:खाची अमावस्या हरावी म्हणून स्वत: प्रकाशमान बनतात. गावकरी बंधूंनो ऽ कालपर्यंत तुमचे बाजी आणि फुलाजी फक्त सिंध गावचे होते. ते आता अवघ्या स्वराज्याचेच नव्हे तर भविष्यकाळाचेही स्फूर्तिदायी तारे बनलेत! जोवर आम्हा मराठ्यांच्या पराक्रमाचा पोवाडा इतिहास आणि भविष्यकाळ गात राहतील, तोवर बाजी-फुलाजींच्या, शंभुजी जाधव, वाहवाह आणि शिवा काशिदांच्या नावाच्या गौरवपताका फडकतच राहतील!''

गावकऱ्यांचा निरोप घेऊन घोड्यावर स्वार होण्यापूर्वी राजांची दृष्टी पलीकडे गेली. त्यांच्या हेर पथकाचा एक सुभेदार त्यांच्यासाठी तिष्ठत उभा होता. राजांनी तिथेच बाजूला आडोशाला थांबून त्याच्याकडून ताज्या वार्ता जाणून घेतल्या. पुणे परिसरातल्या शाहिस्त्याच्या हालचाली आणि बुऱ्हाणपूर आग्र्याकडची वार्तापत्रेही थोडक्यात ऐकून घेतली. त्यानंतरच राजांची घोडी त्या परिसरातून झपाट्याने बाहेर पडली.

◆

अ भि प्रा य

## महेश कोठारेंच्या आठवणींचा खजिना


'डॅम इट आणि बरंच काही' हे महेश कोठारे यांचं आत्मचरित्र म्हणजे, त्यांच्या लहानपणापासूनच्या आठवणींचा रंगीबेरंगी खजिना आहे. हिंदी-मराठी चित्रपटसृष्टी, थोड्या प्रमाणात मराठी रंगभूमी आणि गेल्या काही वर्षांपासून मराठी छोटा पडदा या क्षेत्रांमध्ये तब्बल ६ दशकं त्यांनी दिग्दर्शन, निर्मिती, अभिनय, लेखन अशी भरपूर मुशाफिरी केली आहे. त्यातही मराठी चित्रपटांचं स्वरूप बदलण्यात महेश कोठारे यांचं बरंच योगदान आहे. विशेषत: ८०च्या दशकात तमाशापटांतून चित्रपटांना बाहेर काढण्याचं श्रेय रास्तपणे सचिन-महेश जोडगोळीला दिलं जातं.

महेश कोठारेंनी बाल कलाकार म्हणून आलेले अनुभव अगदी रंगवून सांगितले आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीमुळे अनेक दिग्गजांचा सहवास लाभला आणि त्यातून भरपूर शिकायलाही मिळालं. या प्रवासाबद्दल वाचताना मराठी चित्रपट कसा बदलत गेला, हेही काही प्रमाणात कळतं. लक्ष्मीकांत बेर्डे, सूर्यकांत लवंदे यांच्यासारख्या कलाकार-तंत्रज्ञ सहकाऱ्यांबरोबर जमलेली जोडी, कामाच्या प्रवासात अशोक सराफ, अण्णासाहेब देऊळगावकर, कमलाकर तोरणे यांच्याबरोबर दुरावलेली आणि पुन्हा जुळलेले संबंध, नवनवीन तंत्रज्ञान शिकण्यासाठी केलेली धडपड, त्यातून मिळालेलं यश, रौप्य महोत्सव साजरे करणारे चित्रपट, अहंकाराच्या नादात केलेल्या चुका, त्यामुळे घडलेली अद्दल, ढासळलेली आर्थिक परिस्थिती, त्यातून सावरताना केलेली धडपड, कुटुंबीयांची साथ, त्याच्या साहाय्याने अपयशावर केलेली मात या सर्वांचा धांडोळा यामध्ये घेण्यात आला आहे.



बालकलाकारांचं वय उलटल्यानंतर आणि हिरो म्हणून स्वत:ला स्थापित करेपर्यंत त्यांनी

वकिली केली.सुशिक्षित आणि सुस्थितीतील कुटुंबात जन्म झाल्यानंतर आई-वडिलांकडून मिळालेली शिकवण, इंग्रजी माध्यमातून शालेय आणि उच्चशिक्षण याचाही त्यांच्या जडणघडणीत प्रभाव दिसतो.





पुस्तकाचं शब्दांकन आणि संपादन मंदार जोशी यांनी केलं आहे. पुस्तक प्रकरणांनुसार लिहिलंय. पुस्तकाची निर्मितीमूल्यही महेश कोठारे यांच्या शैलीला साजेशी आहेत-चकचकीत आणि स्टायलिश.

**— दै. लोकसत्ता**
९.४.२०२३

## उत्सुकता वाढविणारे विज्ञान जग...

आपलं जगणं सुसह्य करण्यासाठी माणसाने नेहमी विज्ञानाची मदत घेतलेली आहे. त्यामुळे माणूस सतत विज्ञानात संशोधन करत असतो. आज भौतिक, रसायन, वनस्पती, अंतराळ, हवामान शास्त्रासोबतच जीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, जैवभौतिकी, जैवरसायन, जैवमाहिती, जनुकीय सारख्या आंतरप्रणाली शाखांमध्ये विविध प्रयोग केले जात आहेत. या विविध प्रयोगांची दखल विज्ञान कथालेखक आपल्या कथांमध्ये घेताना दिसत आहे. सशक्त विज्ञानाच्या पार्श्वभूमीवर आधारित विज्ञानकथा लिहिणारे डॉ. संजय ढोले एक नावाजलेले विज्ञानकथा लेखक आहेत. त्यांचा 'खुजाबा' हा सातवा विज्ञान कथा- संग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. या कथासंग्रहात विज्ञानाची परिभाषा करणाऱ्या व समाजातील विसंगतीवर बोट ठेवणाऱ्या अशा बारा कथांचा समावेश आहे.




कथासंग्रहाच्या सुरुवातीला डॉ. संजय ढोले यांनी आपल्या मनोगतात म्हटले आहे की, विज्ञानकथांमधले विज्ञान हे खरे असून, आज चालू असलेला

प्रयोग कदाचित उद्या एक वेगळी तंत्रज्ञानक्रांती घडवून आणू शकतो. एखाद्या विज्ञान कथेतील विज्ञान हे पाच-दहा वर्षांनंतर खरे ठरू शकते. सध्या तंत्रज्ञान एवढ्या झपाट्यानं विकसित होत आहे की, कितीतरी अशक्य गोष्टी शक्य होताना आपल्याला दिसत आहेत. या बदललेल्या तंत्रज्ञानाचा माणूस चांगल्या कामांसाठी जसा उपयोग करू शकतो, तसाच तो स्वत:च्या फायद्यासाठी त्याचा दुरुपयोगही करू शकतो. या सगळ्यांचा विचार 'खुजाबा' संग्रहातील कथा लिहिताना लेखकाने केलेला दिसून येतो.

गुन्हेगारांना शोधणे हे पोलिसांचे काम आहे. परंतु जेव्हा गुन्हेगार सापडत नाही तेव्हा त्यांना शोधण्यासाठी बदलत्या तंत्रज्ञानाचा व संशोधनाचा कसा उपयोग केला जाऊ शकतो, हे 'अपहरण' व 'साक्षीदार' या कथांमधून दिसून येते. संशोधन करणारे काही शास्त्रज्ञ आपल्या संशोधनाचा दुरुपयोग करून देशाचे कसे शत्रू बनू शकतात, हे आपल्याला 'आगंतुक,' 'अंधार गुणिले अंधार' या कथांमध्ये वाचायला मिळते.

मासिक पाळीला अपवित्र मानणाऱ्या स्त्रीला त्याच मासिक पाळीमुळे दुर्धर आजारावर मात करायला कशी मदत होते व तिच्या आयुष्याला कशी कलाटणी मिळते, हे 'कलाटणी' या कथेत वाचण्यासारखे आहे.

जसे आपले शत्रू आपल्या पृथ्वीवर आहेत, तसेच ते परग्रहावर देखील असतील, अशी कल्पना माणसाच्या मनात नेहमी येत असते. हे परग्रहावरून येणारे आव्हान कसे असू शकेल, याची झलक 'अज्ञात जीवाणू' व 'संकेत' या कथांमध्ये वाचायला मिळते.

मानवाने आपल्याला मदत व्हावी म्हणून यंत्रमानवाची निर्मिती केली आहे. पण यंत्रमानवात जर मानवासारख्या जाणिवा प्रगल्भ झाल्या तर तो स्वत: निर्णय घेऊन मानवाचा कसा घात करू शकतो, हे 'अपघात' या कथेत वाचायला मिळते. हा यंत्रमानव जर नॅनो टेक्नोलॉजिने बनवलेला, डोळ्यांनी न दिसणारा 'खुजाबा' म्हणजे 'नॅनो यंत्रमानव' असला तरी तो किती भयंकर उत्पात करू शकतो, हे 'खुजाबा' कथेत वाचून आपण अवाक् होतो. कथासंग्रहाला दिलेल्या शीर्षकाची ही कथा तंत्रज्ञानापुढे माणूस हतबल होऊ शकतो, हे दर्शविणारी आहे.

विज्ञानाच्या प्रगतीमुळे डोळे, किडणी, यकृत, हृदय, स्वादुपिंड, फुप्फुस या अवयवांचे प्रत्यारोपण करणे शक्य झाले आहे. पण जर मेंदूचे प्रत्यारोपण

यशस्वी झाले तर काय होऊ शकते, हे 'कालचक्र' या कथेत वाचायला मिळते. नाभिकीय क्षेत्राशी संबंधित असणारी 'अगम्य' कथा व जीवाणू, विषाणूंच्या डी.एन.ए. मध्ये परिवर्तीत केल्यानंतर काय परिणाम होऊ शकतो, हे दर्शविणारी 'शिखंडी'कथाही वाचण्यासारखी आहे.

डॉ. संजय ढोले भौतिकशास्त्राचे प्राध्यापक व संशोधक असल्यामुळे त्यांच्या कथांमधून विज्ञानप्रसाराबरोबर प्रबोधनही होताना दिसते. प्रत्येक कथेचा बाज वेगळा असल्यामुळे वाचकाची कथा वाचत असताना उत्सुकता ताणली जाते. कथासंग्रहाची भाषा सामान्य वाचकाला समजेल अशी आहे. कथासंग्रहाचे मुखपृष्ठ आकर्षक व कथांना साजेसे आहे. लहानात लहान पेशींपासून माणसाने बनविलेला जीवाणू, जेव्हा माणसासारखा मेंदूचा वापर करू लागतो तेव्हा तो त्याला बनविणाऱ्या माणसालाच खुजं करून अगतिक होण्यास भाग पाडतो. हा आशय बोलका करणारं चंद्रमोहन कुलकर्णी यांचं मुखपृष्ठ वाचकांना आकर्षित करणारं आहे. २१व्या शतकातील बदलत्या विज्ञान व तंत्रज्ञानाची साक्ष देणाऱ्या 'खुजाबा' कथासंग्रहातील विज्ञानकथा विज्ञान अभ्यासकांबरोबर सामान्य वाचकांनाही आवडतील अशा आहेत.

**– मंगल कातकर (दै. लोकसत्ता)**

◆


**अभिनंदन**



आमचे सहकारी श्री. रोहित पाटील यांना एका अनोळखी खात्यावरून २२ हजार ५०० रुपये गुगल पे द्वारे खात्यात जमा झालेले निदर्शनास आले. ती मोठी रक्कम कुणाच्या खात्यातून आली, हे पडताळले असता ते खाते राहुल ओसवाल यांचे असल्याचे त्यांना समजले. त्यांना संपर्क करून रोहित पाटील यांनी सदर रक्कम ओसवाल यांना परत करून त्यांच्यातील प्रामाणिकपणा दाखवून दिला. त्याबद्दल रोहित पाटील यांचे मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे मन:पूर्वक अभिनंदन तसेच या महिन्यातील २९ तारखेला त्यांचा वाढदिवस आहे, त्यानिमित्त त्यांना खूप खूप शुभेच्छा !

**नवी संहिता... नवा आशय...**

# रिपोर्टिंग पाकिस्तान





**मीना मेनन**

अनुवाद : **मुक्ता देशपांडे**

इस्लामाबादमध्ये वास्तव्य करून पाकिस्तानचा आँखो देखा हाल माध्यमांतून मांडणाऱ्या मीना मेनन यांचं लक्षवेधी अनुभवकथन

**किंमत : ६००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# लाल बर्फाचे खोरे




**जीतेंद्र दीक्षित**

अनुवाद : **पराग पोतदार**

व्यापक ग्राऊंड रिपोर्टच्या माध्यमातून मांडली गेलेली बदलत्या काश्मीरची वस्तुनिष्ठ कहाणी

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


## नवी संहिता... नवा आशय...

**TBC-32 Book No. 4**

# धिस वॉज अ मॅन

**जेफ्री आर्चर**

अनुवाद
**लीना सोहोनी**





Master story teller जेफ्री आर्चर यांच्या ‘द क्लिप्टन क्रॉनिकल्स’ या मालिकेचा सातवा भाग

**किंमत : ११०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

---

**TBC-32 Book No. 5**






**रॉबर्ट क्रेस ।** अनुवाद : **सुरेश देशपांडे**

पौगंडावस्थेतल्या अल्लडपणातून घडलेल्या गुन्ह्यांचा शोध काढताना एल्विस कोल आणि ज्यो पाइकनं वापरलेल्या शोधतंत्राची रंजक कथा...

**किंमत : ४१०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## १६ मे ते १५ जून २०२३ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

### खालील संचांवर १६ ते ३१ मे दरम्यान खास सवलत

**१७ मे - अंजनी नरवणे यांचा जन्मदिन.**

'आपण आपले ताणतणाव-एक चिंतन','हितगूज–तणावयुगातील तरुण पिढीशी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१८ मे - मृणालिनी सावंत यांचा जन्मदिन**

'उत्तुंग' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ७९०/- । सवलत किंमत ५५३/-**

---

**२४ मे - राजदीप सरदेसाई यांचा जन्मदिन**

'डेमोक्रसीज इलेव्हन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३४९/-**

---

**२५ मे - गणेश मानुगडे यांचा जन्मदिन**

'बाजिंद', 'धना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २८४/-**

---

**२८ मे - इयान फ्लेमिंग यांचा जन्मदिन**

'फ्रॉम रशिया विथ् लव्ह', 'गोल्डफिंगर', 'ऑक्टोपसी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**२९ मे - जागतिक शांतताप्रिय दिवस**

संच १ - 'मी मलाला', 'महात्मा गांधी आणि तीन माकडे', 'ममतेची मूर्ती मदर तेरेसा', 'मदर तेरेसा' या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत ८७५/- । सवलत किंमत ५२९/-**

संच २ - 'मोहनदास', 'दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल' या पुस्तकांवर विशेष सवलत

**मूळ किंमत ११२०/- । सवलत किंमत ६७२/-**

**३१ मे - अहिल्याबाई होळकर यांचा जन्मदिन**

'कर्मयोगिनी', 'सतिसाध्वी देवी अहिल्या' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३१२/-**

KARMAYOGINI (English) या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**३१ मे - मिलिंद जोशी यांचा जन्मदिन**
'एका परिसाची कथा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---

**खालील संचांवर १मे ते १५ जून दरम्यान खास सवलत**

**१ जून - ल. सि. जाधव यांचा जन्मदिन**
'अडगळ', 'धर्मवेध' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६७०/- । सवलत किंमत ४५६/-**

---

**१ जून - राजन गवस यांचा जन्मदिन**
'आपण माणसात जमा नाही', 'भंडारभोग-५', 'चौंडकं', 'रिवणावायली मुंगी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७५०/- । सवलत किंमत ४८९/-**

---

**१ जून - बा. ग. केसकर यांचा जन्मदिन**
'डव्हाळं', 'सुर्वंता'या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-**

---

**१ जून - दादासाहेब मोरे यांचा जन्मदिन**
'गबाळ', 'अंधाराचे वारसदार', 'विमुक्त' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ५३०/- । सवलत किंमत ३१८/-**

---

**१ जून - लक्ष्मण माने यांचा जन्मदिन**
'उपरा', 'किटाळ', 'पालावरचं जग', 'खेळ साडेतीन टक्क्यांचा', 'बंद दरवाजा', 'भटक्याचं भारूड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७२०/- । सवलत किंमत १२९०/-**

**१ जून - वसंत गायकवाड यांचा जन्मदिन**

'तथागत गोतम बुद्ध' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १४००/- । सवलत किंमत ९८०/-**

**४ जून - आनंद कान्हेरे यांचा जन्मदिन**

'मॅस्वी कान्हेरे' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ९९/-**

**४ जून-जागतिक निष्पाप मुलांचा क्रूर बळी दिवस**

**संच १**-'हरवलेले बालपण', 'झोंबी', 'खाली जमीन वर आकाश', 'वेस्टेड', 'हिरॉईन ऑफ द डेझर्ट', 'बिलाँगिंग' 'नेव्हर टू रिटर्न', 'अॅन आय फॉर अॅन आय', 'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २७८५/- । सवलत किंमत १७२७/-**

**संच २** - 'डिनायल', 'द डायरी ऑफ मेरी बर्ग', 'वेदनेची फुले', 'मी मलाला', 'लिव्हिंग नॅटली' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२३५/- । सवलत किंमत ७५३/-**

**५ जून - जागतिक पर्यावरण दिवस**

**संच १** - 'वसुंधरा', 'पर्यावरण प्रदूषण', 'वेध पर्यावरणाचा', 'आपली सृष्टी १० पुस्तकांची मालिका', 'वायू प्रदूषण', 'विपुलाच सृष्टी', 'कथारूपी खगोलशास्त्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २४३०/- । सवलत किंमत १५५५/-**

**संच २** - 'केल्याने होत आहे रे','अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!', 'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'अंतरिक्षाचा वेध', 'अवनी एक नवी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११००/- । सवलत किंमत ७१५/-**

**५ जून - केन फोलेट यांचा जन्मदिन**

'ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

**६ जून - एम. जे. हायलंड यांचा जन्मदिन**
'कॅरी मी डाऊन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-**

---

**८ जून - रामचंद्र खाटमोडे यांचा जन्मदिन**
'सर्जा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**९ जून - किरण बेदी यांचा जन्मदिन**
किरण बेदी यांच्या अकरा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २८९५/- । सवलत किंमत २२१४/-**

---

**१० जून - बाबाराव मुसळे यांचा जन्मदिन**
'वारूळ', 'नो नॉट नेव्हर', 'हाल्या हाल्या दुधू दे!', 'झुंड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १८८५/- । सवलत किंमत १४१५/-**

---

**११ जून - जॉर्जिना हार्डिंग यांचा जन्मदिन**
'हेरगिरीचा पोरखेळ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**१२ जून - ॲन फ्रँक यांचा जन्मदिन**
'डायरी ऑफ ॲन फ्रँक' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**१२ जून - जागतिक बालकामगार विरोधी दिन**
**संच १** - 'हरवलेलं बालपण', 'खाली जमीन वर आकाश', 'सर्चिंग फॉर डॅडी', 'शेम', 'हिरॉइन ऑफ द डेझर्ट', 'वेदनेची फुले', 'शॅपेल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १६५०/- । सवलत किंमत १०२३/-**
**संच २** - 'झोंबी', 'वेस्टेड', 'बिलाँगिंग', 'नेव्हर टू रिटर्न', 'ॲन आय फॉर ॲन आय', 'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २०७५/- । सवलत किंमत १२४५/-**

**१२ जून - भा. द. खेर यांचा जन्मदिन**

भा. द. खेर यांच्या अकरा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३७६०/- । सवलत किंमत २७७५/-**

---

**१४ जून - जी. डी. मोरे यांचा जन्मदिन**

**A Methodical English Grammar** या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-**

---

**१५ जून-अण्णा हजारे यांचा जन्मदिन**

'अण्णा हजारे', 'लढा लोकपालचा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-**

◆

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

## सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाइल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्सॲप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

## डॉ. सुरज एंगडे यांची प्रा. हरी नरके यांनी घेतलेली मुलाखत रंगली

### मेहता पब्लिशिंग हाऊस पुस्तकदालनात









# हार्वर्ड स्कॉलर डॉ. सुरज एंगडे यांच्यासोबत तरुणाईने साधला मुक्त संवाद



**'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023**

**RNI. No. MAHMAR/2000/02739**

Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.

Publication Date : 11/05/2023 Posting Date : 11/05/2023




**मेहता मराठी ग्रंथजगत**

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,